भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# अधिवक्ता अधिनियम, १९६१

**(१९६१ चा अधिनियम क्रमांक २५)**

[ २६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान ]

# The Advocate Act, 1961

**(Act No. 25 of 1961)**

[ *As in force on the 26th February, 2004* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[ **किंमत :** रुपये २५.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि ॲडव्होकेटस् ॲक्ट, १९६१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर, २००४ यात पृष्ठ १०९ ते १४१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्रधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३. याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १४ ऑक्टोबर, २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Advocate Act, 1961 as on the 26th February, 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October, 2004 on pages 109 to 141.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 4th October, 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# अधिवक्ता अधिनियम, १९६१

## कलमांचा क्रम

कलमे

प्रकरण एक

**प्रारंभिक**


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.


प्रकरण दोन

**वकील परिषदा**


३. राज्य वकील परिषदा.

४. भारतीय वकील परिषद.

५. वकील परिषद निगमनिकाय.

६. राज्य वकील परिषदांची कार्ये.

७. भारतीय वकील परिषदेची कार्ये.

७क. आंतरराष्ट्रीय निकायांमध्ये सदस्यत्व.

८. राज्य वकील परिषदेच्या सदस्यांचा पदावधी.

८क. निवडणुकीच्या अभावी विशेष समिती घटित करणे.

९. शिस्तविषयक समिती.

९-क. विधिविषयक सहाय्य समित्यांची घटना.

१०. शिस्तविषयक समित्यांव्यतिरिक्त इतर समित्यांची घटना.

१०क. वकील परिषदा आणि त्यांच्या समित्यांद्वारे केले जाणारे कामकाज.

१०ख. वकील परिषदेच्या सदस्यांची अनर्हता.

११. वकील परिषदेचा कर्मचारीवर्ग.

१२. लेखे व लेखापरीक्षा.

१३. वकील परिषद आणि तिच्या समित्यांमधील रिक्त पदांमुळे केलेली कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

१४. काही विशिष्ट कारणांमुळे वकील परिषदांच्या निवडणुकीला हरकत घेता येणार नाही.

१५. नियम करण्याचा अधिकार.


प्रकरण तीन

**अधिवक्त्यांना प्रवेश देणे व त्यांची नावनोंदणी करणे**


१६. वरिष्ठ व इतर अधिवक्ते.

१७. राज्य वकील परिषदांनी अधिवक्त्यांची नामावली ठेवणे.

१८. एका राज्य नामावलीतून दुसऱ्या राज्य नामावलीकडे स्थानांतरित करणे.

१९. राज्य वकील परिषदेने अधिवक्त्यांच्या नामावलीच्या प्रती भारतीय वकील परिषदेला पाठविणे.

२०. सर्वोच्च न्यायालयाच्या विवक्षित अधिवक्त्यांच्या नावनोंदणीसाठी विशेष उपबंध.

२१. वरिष्ठतेसंबंधी वाद.

२२. नावनोंदणी प्रमाणपत्र.

२३. पूर्वसुनावणीचा अधिकार.

२४. राज्य नामावलीमध्ये दाखल करून घेतल्या जाऊ शकतील अशा व्यक्ती.

२४क. नावनोंदणीसाठी अनर्हता.

२५. नावनोंदणीसाठी ज्यांच्याकडे अर्ज करावयाचे ते प्राधिकरण.

२६. अधिवक्ता म्हणून दाखल करून घेण्यासाठीचे अर्ज निकालात काढणे.

२६क. नामावलीमधून नाव काढून टाकण्याचा अधिकार.

२७. विवक्षित परिस्थिती वगळता एकदा नाकारलेला अर्ज दुसऱ्या वकील परिषदेद्वारे विचारात घेतला जाऊ नये.

२८. नियम करण्याचा अधिकार.

प्रकरण चार

**विधी व्यवसाय करण्याचा अधिकार**

२९. विधी व्यवसाय करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींचा एकमेव मान्यताप्राप्त वर्ग अधिवक्ता हाच असेल.

३०. अधिवक्त्याचा विधि व्यवसाय करण्याचा अधिकार.

३१. [निरसित.]

३२. विशिष्ट प्रकरणांमध्ये उपस्थित राहण्यास परवानगी देण्याचा न्यायालयाचा अधिकार.

३३. फक्त अधिवक्तेच विधी व्यवसाय करण्यास हक्कदार असतील.

३४. उच्च न्यायालयाचा नियम करण्याचा अधिकार.

प्रकरण पाच

**अधिवक्त्याची वर्तणूक**

३५. गैरवर्तणुकीसाठी अधिवक्त्यांना शिक्षा.

३६. भारतीय वकील परिषदेचे शिस्तविषयक अधिकार.

३६क. शिस्तविषयक समितीच्या घटनेतील बदल.

३६ख. शिस्तविषयक कार्यवाही निकालात काढणे.

३७. भारतीय वकील परिषदेकडे अपील करणे.

३८. सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करणे.

३९. १९६३ च्या मुदत अधिनियमातील कलम ५ आणि १२ लागू करणे.

४०. आदेशांची स्थगिती.

४१. अधिवक्त्यांच्या नामावलीत फेरबदल करणे.

४२. शिस्तविषयक समितीचे अधिकार.

४२क. भारतीय वकील परिषद आणि इतर समित्यांचे अधिकार.

४३. शिस्तविषयक समितीसमोरील कार्यवाहीचा वादखर्च.

४४. शिस्तविषयक समितीकडून आदेशाचे पुनर्विलोकन.

प्रकरण सहा

**संकीर्ण**

४५. न्यायालयात आणि इतर प्राधिकरणासमोर अवैधतेने विधी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना शास्ती.

४६. [निरसित.]

४६क. राज्य वकील परिषदेस वित्तीय सहाय्य.

४७. देवाणघेवाण.

४८. विधिविषयक कार्यवाह्यांविरुद्ध हानीरक्षण.

४८क. पुनरीक्षणाचा अधिकार.

४८कक. पुनर्विलोकन.

४८ख. निदेश देण्याचा अधिकार.

४९. भारतीय वकील परिषदेतील नियम करण्याचा सर्वसाधारण अधिकार.

४९क. केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.

५०. विवक्षित अधिनियमितीचे निरसन.

५१. निर्वाचनाचा नियम.

५२. व्यावृत्ती.

प्रकरण सात

**अस्थायी आणि संक्रमणात्मक उपबंध**

५३. पहिल्या राज्य वकील परिषदेकरिता निवडणुका.

५४. पहिल्या राज्य वकील परिषदेच्या सदस्यांचा पदावधी.

५५. विवक्षित विद्यमान विधिव्यवसायीच्या हक्कांना बाधा न घेणे.

५६. विद्यमान वकील परिषदेचे विसर्जन.

५७. वकील परिषद घटित होईपर्यंत नियम करण्याचा अधिकार.

५८. संक्रमण काळातील विशेष उपबंध.

५८क. विवक्षित अधिवक्त्यांच्या संबंधात विशेष उपबंध.

५८क क. पाँडेचरीच्या संघराज्य क्षेत्राच्या संबंधातील विशेष उपबंध.

५८क ख. म्हैसूर राज्य वकील परिषदेने नोंदणी केलेल्या विवक्षित व्यक्तींच्या संबंधात विशेष उपबंध.

५८क ग. उत्तरप्रदेश वकील परिषदेने नोंदणी केलेल्या विवक्षित व्यक्तींच्या संबंधात विशेष उपबंध.

५८क घ. भारतामध्ये स्थलांतर करू न देणाऱ्या विवक्षित व्यक्तींसाठी विशेष उपबंध.

५८क ङ. गोवा, दमण व दीव या संघराज्य क्षेत्रासंबंधात विशेष उपबंध.

५८क च. जम्मू व काश्मीरच्या संबंधातील विशेष उपबंध.

५८क छ. आबद्ध शिक्षार्थीच्या संबंधात विशेष उपबंध.

५८ख. विवक्षित शिस्तविषयक कार्यवाहीसंबंधातील विशेष उपबंध.

५९. अडचणी दूर करणे.

६०. केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.

**अनुसूची.**

# अधिवक्ता अधिनियम, १९६१

## (१९६१ चा अधिनियम क्रमांक २५)

(२६ फेब्रुवारी २००४ रोजी यथाविद्यमान) [१९ मे १९६१]

**विधी व्यावसायिकांसंबंधीच्या कायद्यात विशोधन करण्यासाठी व ते संकलित करण्यासाठी आणि वकील परिषद व अखिल भारतीय वकील परिषद घटित करण्याची तरतूद करण्याकरता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास " अधिवक्ता अधिनियम, १९६१ " असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

[१][(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.]

(३) तो, केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास [२] [३][पोटकलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रदेशाखेरीज इतर प्रदेशांच्या संबंधात अंमलात येईल] आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक [२] नियत करता येतील.

---

१. १९७३ च्या अधिनियम ६०, कलम २ द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी १९७४ रोजी व तेव्हापासून).

२. या अधिनियमाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे अंमलात आणण्यात आल्या :—

| दिनांक | तरतुदी | सूचना |
|---|---|---|
| १६ ऑगस्ट, १९६१ | प्रकरणे एक, दोन आणि सात. | स्थायी आदेश, १८७०, दिनांक ७ ऑगस्ट, १९६१, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), इं. पृ. १२३७. |
| १ डिसेंबर, १९६१ | प्रकरण तीन आणि कलम ५० (२). | स्थायी आदेश, २७९०, दिनांक २४ नोव्हेंबर, १९६१, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), इं. पृ. १७२३. |
| १५ डिसेंबर, १९६१ | कलम ५० (१). | स्थायी आदेश, २९१९, दिनांक १३ डिसेंबर, १९६१, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), इं. पृ. १७४५. |
| २४ जानेवारी, १९६२. | कलम ५१ आणि ५२ | स्थायी आदेश, २९७, दिनांक २४ जानेवारी, १९६२, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), इं. पृ. १६९. |
| २९ मार्च, १९६२ | कलम ४६ | स्थायी आदेश, ९५८, दिनांक २९ मार्च, १९६२, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), इं. पृ. ५८९. |
| ४ जानेवारी, १९६३ | कलम ३२ आणि प्रकरण सहा [कलम ४६, कलम ५० चे पोटकलम (१) व (२), कलम ५१ व ५२ शिवाय]. | स्थायी आदेश, ५०, दिनांक ४ जानेवारी, १९६३, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), इं. पृ. १. |
| १ सप्टेंबर, १९६३ | प्रकरण पाच | स्थायी आदेश, २५०९, दिनांक ३१ ऑगस्ट, १९६८, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३(दोन), इं. पृ. ५१३. |
| १० जून, १९६८, पाँडेचरी संघराज्य क्षेत्रामध्ये | प्रकरण एक, दोन, तीन, प्रकरण चार चे कलम ३२ व प्रकरणे पाच, सहा, सात व आठ. | स्थायी आदेश, ६३, दिनांक ७ जून, १९६८, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३(दोन). |
| १ जून, १९६९ | प्रकरण चारचे कलम २९ ३१, ३३ व ३४. | स्थायी आदेश, १५००, दिनांक ५ एप्रिल, १९६९, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), इं. पृ. ५६९. |
| १ जून, १९७९, गोवा, दमण व दीव या संघराज्य क्षेत्रामध्ये | कलम ३० शिवाय | स्थायी आदेश, ८४ (ई), दिनांक २१ फेब्रुवारी, १९७९, **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, कलम ३ (दोन), इं. पृ. १६८. |

३. १९७३ चा अधिनियम ६०, याच्या कलम २ द्वारे " अंमलात येईल " याऐवजी हा मजकूर दाखल केला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[१][(४) हा अधिनियम, जम्मू आणि काश्मीर * हे राज्य व गोवा, दमण आणि दीव हे संघ राज्यक्षेत्र यांच्या बाबतीत केंद्र सरकार या संदर्भात **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.]

व्याख्या. २. [२][(१)] या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) " अधिवक्ता " याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये कोणत्याही नामावलीमध्ये नोंद केलेला अधिवक्ता, असा आहे ;

(ख) " नियत दिवस " याचा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींच्या बाबतीत अर्थ, ती तरतूद ज्या दिवशी अंमलात येते तो दिवस, असा आहे ;

[३][* * * * *]

(घ) " वकील परिषद " याचा अर्थ, या अधिनियमान्वये घटित करावयाची वकील परिषद, असा आहे ;

(ङ) " भारतीय वकील परिषद " याचा अर्थ, ज्या क्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यांच्यासाठी कलम ४ अन्वये घटित करण्यात येईल अशी वकील परिषद, असा आहे ;

[४][* * * * *]

(छ) " उच्च न्यायालय " यात, कलम ३४ चे पोटकलम (१) [५][आणि पोटकलम (१क)] व कलम ४२ आणि ४३ खेरीजकरून न्यायिक आयुक्त यांच्या न्यायालयाचा अंतर्भाव होत नाही आणि राज्य वकील परिषदेच्या संबंधात त्याचा अर्थ,—

(एक) एखाद्या राज्यासाठी किंवा एखादे राज्य आणि एक किंवा त्यापेक्षा अधिक संघ-राज्यक्षेत्र यांसाठी घटित करावयाच्या वकील परिषदेच्या बाबतीत, त्या राज्याचे उच्च न्यायालय, असा आहे ;

(दोन) दिल्लीसाठी घटित करावयाच्या वकील परिषदेच्या बाबतीत [६][दिल्ली उच्च न्यायालय], असा आहे ;

(ज) " विधि पदवीधर " याचा अर्थ, भारतात कायदेशीररीत्या स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यापीठातून विधिविषयक स्नातक पदवी मिळवलेली व्यक्ती, असा आहे ;

(झ) " विधिव्यवसायी " याचा अर्थ, कोणत्याही उच्च न्यायालयाचा एखादा अधिवक्ता [७][किंवा वकील], प्लीडर, मुखत्यार किंवा महसूल अभिकर्ता, असा आहे ;

(ञ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(ट) " नामावली " याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार केलेली व बाळगलेली अधिवक्त्यांची नामावली, असा आहे ;

(ठ) " राज्य " यात, संघ राज्यक्षेत्राचा अंतर्भाव होत नाही ;

(ड) " राज्य वकील परिषद " याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेली वकील परिषद, असा आहे ;

(ढ) " राज्य नामावली " याचा अर्थ, कलम १७ अन्वये राज्य वकील परिषदेने तयार केलेली व बाळगलेली नामावली, असा आहे ;

---

* या अधिनियमातील कलम ३० खेरीजकरून सर्व तरतुदी जम्मू व काश्मीर राज्यामध्ये (१ ऑगस्ट, १९८६ रोजी व तेव्हापासून) अंमलात येतील. पहा—अधिसूचना जी. एस. आर. ९४६ (ई) दिनांक १५ जुलै, १९८६.

[१] १९७६ चा अधिनियम ६०, कलम २ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे, कलम २ ला त्याच कलमाच्या पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७६ चा अधिनियम १०७, कलम २ द्वारे खंड (ग) गाळला (१५ ऑक्टोबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[४] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३ द्वारे खंड (च) गाळला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे " पंजाब उच्च न्यायालय " या मजकुराऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[७] १९७६ चा अधिनियम १०७, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१५ ऑक्टोबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[१][(२) जम्मू व काश्मीर या राज्यात किंवा गोवा, दमण आणि दीव या संघ राज्यक्षेत्रात अंमलात नसलेल्या एखाद्या कायद्याचा, या अधिनियमातील कोणत्याही निर्देशांचा, त्या राज्याच्या किंवा क्षेत्राच्या संदर्भातील अर्थ, यथास्थिति, त्या राज्यात किंवा क्षेत्रात अंमलात असलेल्या तत्सम कायद्याचा एखादा असल्यास, निर्देश असा लावला जाईल.]

## प्रकरण दोन

### वकील परिषदा

**३.** (१) (क) आंध्रप्रदेश, बिहार, गुजराथ, [२][जम्मू आणि काश्मीर], [३][झारखंड], [४][मध्यप्रदेश आणि छत्तिसगढ], [५][ * * * ], [६][ * * *], [७][कर्नाटक, ओरिसा, राजस्थान, [८][उत्तर प्रदेश आणि उत्तरांचल] या प्रत्येक राज्यासाठी, राज्य वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी ;] **राज्य वकील परिषदा.**

[९][(ख) अरूणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मिझोरम, नागालँड आणि त्रिपुरा, या राज्यांसाठी आसाम, नागालँड, मेघालय, त्रिपुरा, मिझोरम आणि अरूणाचल प्रदेश वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी ;]

(ग) केरळ राज्य [१०][लक्षद्वीप] बेटे हे संघ राज्यक्षेत्र यासाठी केरळ वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी ;

[११][(गग)] [१२][तामिळनाडू राज्य] आणि पाँडेचरी संघ राज्यक्षेत्र यांसाठी मद्रास वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी ;]

[१३][(गगग)] महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांसाठी आणि दादरा व नगर हवेली आणि दमण व दीव या संघ राज्यक्षेत्रांसाठी, महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी ;]

[१४][(घ) पंजाब व हरियाणा या राज्यांसाठी आणि चंदीगड या संघ राज्यक्षेत्रासाठी पंजाब व हरियाणा वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी ;

(घघ) हिमाचल प्रदेश राज्यासाठी, हिमाचल प्रदेश वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी ;]

(ङ) पश्चिम बंगाल राज्य आणि [१५][अंदमान व निकोबार बेटे संघ राज्यक्षेत्र] यांसाठी पश्चिम बंगाल वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी ; आणि

(च) दिल्ली संघ राज्यक्षेत्रासाठी दिल्ली वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी, वकील परिषद असेल.

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] बिहार पुनर्रचना अधिनियम, २००२ याच्या कलम २८, पोटकलम (१) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (२५ ऑगस्ट, २००० रोजी व तेव्हापासून).

[४] मध्यप्रदेश पुनर्रचना अधिनियम, २००० याच्या कलम २४, पोटकलम (१) द्वारे " मध्यप्रदेश " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२५ ऑगस्ट, २००० रोजी व तेव्हापासून).

[५] १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूची द्वारे " मद्रास " हा शब्द गाळला.

[६] १९६३ चा विनियम ८ च्या कलम १२ द्वारे " महाराष्ट्र " हा शब्द गाळला (१ जुलै, १९६५ रोजी व तेव्हापासून).

[७] म्हैसूर राज्य (नामांतर) (संघराज्य विषयांवरील विधीचे अनुकूलन) आदेश, १९७४ द्वारे " म्हैसूर राज्य " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल केले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[८] उत्तरप्रदेश पुनर्रचना अधिनियम, २००० याच्या कलम २९, पोटकलम (१) द्वारे " आणि उत्तरप्रदेश " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२५ ऑगस्ट, २००० रोजी व तेव्हापासून).

[९] १९७१ चा अधिनियम ८१ याच्या कलम ३४ द्वारे (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून), १९८६ चा अधिनियम ३४ याच्या कलम १६ द्वारे (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून) व १९८६ चा अधिनियम, ६९ याच्या कलम १९ द्वारे (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून) पूर्वी विशोधित केल्याप्रमाणे खंड (ख) ऐवजी हा मजकूर दाखल केला.

[१०] लखदीव, मिनिकॉय व अमिनदिवी बेटे (नामांतर) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ३४) कलम ५ द्वारे " लखदीव, मिनिकॉय आणि अमिनदिवी बेटे " या मजकुराऐवजी हा मजकूर घातला (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[११] १९६८ चा अधिनियम २६ कलम ३ व अनुसूची द्वारे समाविष्ट केले.

[१२] मद्रास राज्य (नामांतर) (संघ विषयांवरील विधीचे अनुकूलन) आदेश, १९७० द्वारे " मद्रास राज्य " या मजकुराऐवजी दाखल केला (१४ जानेवारी, १९६९ रोजी व तेव्हापासून).

[१३] १९८७ चा अधिनियम, १८ कलम २१ (१) (क) द्वारे मूळ खंड (गगग) याऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (३० मे, १९८७ रोजी व तेव्हापासून).

[१४] १९७० चा अधिनियम ५३, कलम २४ द्वारे मूळ खंड (घ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (२५ जानेवारी, १९७१ रोजी व तेव्हापासून).

[१५] १९७१ चा अधिनियम ८१, कलम ३४ द्वारे " त्रिपुरा व अंदमान आणि निकोबार बेटे संघ राज्यक्षेत्र " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

(२) राज्य वकील परिषद खालील सदस्यांची मिळून बनलेली असेल, ते असे :—

(क) दिल्ली राज्य वकील परिषदेच्या बाबतीत भारताचा पदसिद्ध अपर सॉलिसिटर-जनरल [१][आसाम, नागालँड, मेघालय, मणिपूर व त्रिपुरा राज्य वकील परिषदेच्या बाबतीत आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड व त्रिपुरा या प्रत्येक राज्याचा महाअधिवक्ता हा पदसिद्ध ; पंजाब व हरियाणा राज्य वकील परिषदेच्या बाबतीत पंजाब व हरियाणा या प्रत्येक राज्याचा महाअधिवक्ता हा पदसिद्ध ;] आणि इतर कोणत्याही राज्य वकील परिषदेच्या बाबतीत राज्याचा महाअधिवक्ता, पदसिद्ध ;

[२][(ख) राज्य वकील परिषदेच्या मतदार यादीवर असलेल्या अधिवक्त्यांमधून एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार निवडलेले, पाच हजारापेक्षा जास्त मतदारगण नसलेल्या राज्य वकील परिषदेच्या बाबतीत, पंधरा सदस्य, पाच हजारापेक्षा जास्त परंतु, दहा हजारापेक्षा कमी मतदारगण असलेल्या राज्य वकील परिषदेच्या बाबतीत वीस सदस्य, आणि दहा हजारापेक्षा जास्त मतदारगण असलेल्या राज्य वकील परिषदेच्या बाबतीत पंचवीस सदस्य :]

[३][परंतु, शक्य होईल तेथवर, अशा निवडलेल्या सदस्यांमधील निम्मे सदस्य हे, या बाबतीत भारतीय वकील परिषद करील अशा कोणत्याही नियमांच्या अधीन राहून, किमान दहा वर्षे राज्याच्या नामावलीमधील अधिवक्ता म्हणून असलेल्या व्यक्ती असतील आणि अशा कोणत्याही व्यक्तींच्या संबंधात दहा वर्षांचा उक्त कालावधी मोजताना, ती व्यक्ती ज्या कालावधीत भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये नाव नोंदलेला अधिवक्ता असेल, त्या कोणत्याही कालावधीचा अंतर्भाव करण्यात येईल.]

[४][(३) प्रत्येक राज्य वकील परिषदेमध्ये, विहित करण्यात येईल त्या पद्धतीने परिषदेकडून निवडलेला एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असेल.]

(३क) अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९७७ (१९७७ चा ३८) याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही राज्य वकील परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून पद धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे अशा प्रारंभाच्या वेळी अध्यक्षाचे किंवा, यथास्थिति, उपाध्यक्षाचे पद धारण करणे संपुष्टात येईल :

परंतु, अशी प्रत्येक व्यक्ती, अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९७७ (१९७७ चा ३८) याच्या प्रारंभानंतर अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या व्यक्तीने आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारीपर्यंत आपल्या पदाची कर्तव्ये करीत राहील.]

[५][(४) एखाद्या अधिवक्त्याकडे भारतीय वकील परिषदेने त्याबाबतीत विहित केलेली अर्हता नसल्यास किंवा त्या परिषदेने त्याबाबतीत विहित केलेल्या अटींची तो पूर्तता करीत नसल्यास त्या अधिवक्त्यास पोटकलम (२) अन्वये घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही निवडणुकीमध्ये मतदान करण्यास किंवा राज्य वकील परिषदेचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास आणि सदस्य म्हणून पदावर राहण्यास अनर्ह ठरवण्यात येईल आणि प्रत्येक राज्य वकील परिषद, करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून वेळोवेळी मतदारयादी तयार करील व तीत सुधारणा करील.

(५) अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९६४ (१९६४ चा २१) च्या प्रारंभापूर्वी निवडून आलेल्या कोणत्याही सदस्याच्या पदावधीवर पोटकलम (२) च्या परंतुकातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही. परंतु, अशा प्रारंभानंतरची प्रत्येक निवडणूक ही, उक्त परंतुक अंमलात आणण्यासाठी भारताच्या वकील परिषदेने तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार घेण्यात येईल.]

[६][(६) पोटकलम (२) च्या खंड (ख) मधील कोणत्याही गोष्टीमुळे अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ६०) च्या प्रारंभाच्या लगतपूर्वी घटित झालेल्या वकील परिषदेतील निवडून आलेल्या सदस्यांच्या प्रतिनिधित्वावर, ती राज्य वकील परिषद या अधिनियमाच्या तरतुदींनुसार पुनर्घटित होईपर्यंत, कोणताही परिणाम होणार नाही.

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ४ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी दाखल केला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] १९६४ चा अधिनियम २१, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

[४] १९७७ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे, पोटकलम (३) ऐवजी दाखल केले. (३१ ऑक्टोबर, १९७७, रोजी व तेव्हापासून).

[५] १९६४ चा अधिनियम २१, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

[६] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ४ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

४. (१) या अधिनियमाचा विस्तार असलेल्या क्षेत्रांसाठी, भारतीय वकील परिषद म्हणून ओळखली जाणारी एक वकील परिषद असेल, जी खालील सदस्य मिळून बनलेली असेल, ते असे :— **भारतीय वकील परिषद.**

(क) भारताचे महा न्यायवादी, पदसिद्ध ;

(ख) भारताचे सॉलिसिटर जनरल पदसिद्ध ;

[१] * * *

(ग) प्रत्येक राज्य वकील परिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडलेला एक सदस्य.

[२][(१क) कलम ३ च्या पोटकलम (२) मधील परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारणा केली नसेल तर कोणतीही व्यक्ती भारतीय वकील परिषदेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र ठरणार नाही.]

[३][(२) भारतीय वकील परिषदेकडून, विहित करण्यात येईल अशा रीतीने परिषदेचा एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष निवडण्यात येईल.

(२क) अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९७७ (१९७७ चा ३८) याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारतीय वकील परिषदेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पद धारण करणारी व्यक्ती अशा प्रारंभास अध्यक्ष, किंवा यथास्थिति, उपाध्यक्ष म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल :

परंतु, अशी व्यक्ती, अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९७७ (१९७७ चा ३८) याच्या प्रारंभानंतर निवडून आलेला परिषदेचा अध्यक्ष, किंवा, यथास्थिति, उपाध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारीपर्यंत, त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडणे चालू ठेवील.]

[४][(३) राज्य वकील परिषदेने निवडलेल्या, भारतीय वकील परिषदेच्या सदस्याचा पदावधी हा,—

(एक) पदसिद्ध पदावर असलेल्या राज्य वकील परिषदेच्या सदस्याच्या बाबतीत, त्याच्या निवडीच्या दिनांकापासून दोन वर्षांपर्यंत [५][किंवा तो राज्य वकील परिषदेचा सदस्य असल्याचे बंद होईपर्यंत, यातील जे अगोदर होईल तोपर्यंत असेल]; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, तो राज्य वकील परिषदेचा सदस्य म्हणून जेवढा काळ पदावर असेल त्या कालावधीइतका असेल :

परंतु, असा प्रत्येक सदस्य त्याच्या उत्तराधिकाऱ्याची निवड होईपर्यंत, भारतीय वकील परिषदेचा सदस्य म्हणून पद धारण करणे चालू ठेवील].

५. प्रत्येक वकील परिषद ही, अखंड परंपरा व सामाईक मुद्रा असलेला आणि स्थावर व जंगम या दोन्ही प्रकारच्या संपत्ती संपादित करण्याचा व धारण करण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असलेला, निगम निकाय असेल, आणि ज्या नावाने ती ओळखली जात असेल त्या नावानें तिला आणि तिच्यावर दावा लावता येईल. **वकील परिषद निगम निकाय असणे.**

६. (१) राज्य वकील परिषदेची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :— **राज्य वकील परिषदांची कार्ये.**

(क) व्यक्तींना अधिवक्ता म्हणून तिच्या नामावलीमध्ये दाखल करून घेणे ;

(ख) अशी नामावली बनविणे व ती बाळगणे ;

(ग) तिच्या नामावलीतील अधिवक्त्यांच्या विरुद्ध असलेले गैरवर्तनाचे खटले विचारार्थ स्वीकारणे व त्यावर निर्णय घेणे ;

(घ) तिच्या नामावलीतील अधिवक्त्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि हितसंबंध यांचे रक्षण करणे ;

[६][(घघ) या कलमाचे पोटकलम २, खंड (क) आणि कलम ७ चे पोटकलम (२) खंड (क) यात उल्लेखिलेल्या कल्याणविषयक योजनांची प्रभावीरीत्या अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, वकीलसंघाच्या वृद्धीस प्रचालना देणे ;]

(ङ) कायदा सुधारणांचे प्रचालन करणे व त्यांना पाठिंबा देणे ;

---

[१] १९७७ चा अधिनियम ३८, कलम ३ द्वारे खंड (खख) वगळला (३१ ऑक्टोबर, १९७७ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ५ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७७ चा अधिनियम ३८, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३१ ऑक्टोबर, १९७७ रोजी व तेव्हापासून).

[४] १९६४ चा अधिनियम २१, कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

[५] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ५ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[६] १९९३ चा अधिनियम ७०, कलम २, (एक) (क) द्वारे समाविष्ट केले (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[१][(ङङ) विधि संबंधित विषयावर चर्चासत्रे आणि विधि-मीमांसकांची व्याख्याने आयोजित करणे आणि विधिविषयक नियतकालिके व पत्रके प्रकाशित करणे ;

(ङङङ) गरिबांसाठी विधिविषयक सहाय्यांचे विहित रीतीने आयोजन करणे ;]

(च) वकील परिषदेच्या निधीची व्यवस्था पहाणे व त्याची गुंतवणूक करणे ;

(छ) तिच्या सदस्यांच्या निवडणुकीची तरतूद करणे ;

[२][(छछ) कलम ७ च्या पोटकलम (१), खंड (एक) अन्वये दिलेल्या निदेशानुसार विद्यापीठांना भेटी देणे व त्यांचे निरीक्षण करणे ;]

(ज) या अधिनियमाद्वारे किंवा अन्वये तिला प्रदान केलेली इतर सर्व कार्ये पार पाडणे ;

(झ) पूर्वोक्त कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व गोष्टी करणे.

[३][(२) राज्य वकील परिषद, खालील प्रयोजनार्थ, विहित रीतीने एक किंवा अधिक निधी घटित करू शकेल,—

(क) निर्धन, विकलांग किंवा इतर अधिवक्त्यांसाठी कल्याणकारी योजनेचे आयोजन करण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे ;

(ख) या संदर्भात तयार केलेल्या नियमानुसार विधिविषयक सहाय्य किंवा सल्ला देणे ;

[४][(ग) कायदेविषयक ग्रंथालये स्थापन करणे.]

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी, राज्य वकील परिषद, कोणतीही अनुदाने, देणग्या, दाने किंवा धर्मदाने स्वीकारू शकेल व ती त्या पोटकलमाअन्वये घटित झालेल्या समुचित निधीमध्ये किंवा निधींमध्ये जमा केली जातील.]

**भारतीय वकील परिषदेची कार्ये.**

७. [५][(१)] भारतीय वकील परिषदेची कार्ये खालीलप्रमाणे असतील :—

[६][ * * * * ]

(ख) अधिवक्त्यासाठी व्यावसायिक आचार व शिष्टाचार यांची मानके घालून देणे ;

(ग) तिच्या शिस्तविषयक समितीने आणि प्रत्येक राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती ठरवून देणे ;

(घ) अधिवक्त्याचे अधिकार, विशेषाधिकार व हितसंबंध यांचे संरक्षण करणे ;

(ङ) कायदा सुधारणांचे प्रचालन करणे व त्यांना पाठिंबा देणे ;

(च) राज्य वकील परिषदेकडून तिच्याकडे पाठविले जाईल असे, या अधिनियमान्वये उद्‌भवणारे कोणतेही प्रकरण हाताळणे व निकालात काढणे ;

(छ) राज्य वकील परिषदांचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करणे व त्यांवर नियंत्रण ठेवणे ;

(ज) विधिविषयक शिक्षणाला प्रचालना देणे व भारतातील असे शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांशी व राज्य वकील परिषदांशी सल्लामसलत करून अशा शिक्षणाचे मानक घालून देणे ;

(झ) ज्या विद्यापीठाची कायद्याची पदवी ही, अधिवक्ता म्हणून नाव नोंदणीसाठी अर्हता ठरू शकत असेल अशा विद्यापीठांना मान्यता देणे व त्या प्रयोजनार्थ त्या विद्यापीठांना भेटी देणे आणि त्यांचे निरीक्षण करणे [७][किंवा त्या संदर्भात भारतीय वकील परिषदेकडून देण्यात येतील अशा निदेशानुसार विद्यापीठांना भेटी देण्यास व त्यांचे निरीक्षण करण्यास राज्य वकील परिषदेला भाग पाडणे] ;

[८][(झक) विधिसंबंधित विषयांवर चर्चासत्रे आणि श्रेष्ठ विधि-मीमांसकाची व्याख्याने आयोजित करणे आणि विधिविषयक नियतकालिके व पत्रके प्रकाशित करणे.

(झख) गरिबांसाठी विधिविषयक सहाय्याचे विहित रीतीने आयोजन करणे ;

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ६ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] १९९३ चा अधिनियम ७०, कलम २ द्वारे समाविष्ट केले (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ६ द्वारे पोट-कलम (२) ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] १९९३ चा अधिनियम ७०, कलम २ द्वारे समाविष्ट केले. (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[५] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ७ द्वारे कलम ७ ला त्या कलमाचा पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[६] वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे खंड (क) गाळण्यात आला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेंव्हापासून).

[७] १९९३ चा अधिनियम ७०, कलम ३ द्वारे जादा दाखल केले. (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[८] १९९३ चा अधिनियम ६०, कलम ७ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

(झग) या अधिनियमाअन्वये अधिवक्ता म्हणून प्रवेश मिळण्याच्या प्रयोजनार्थ, भारताबाहेर मिळवलेल्या कायदेविषयक विदेशी अर्हताना परस्पर तत्त्वावर मान्यता देणे ;]

(ञ) वकील परिषदेच्या निधीची व्यवस्था लावणे व तो गुंतवणे ;

(ट) तिच्या सदस्यांच्या निवडणुकीची तरतूद करणे ;

(ठ) या अधिनियमाद्वारे किंवा अन्वये तिच्यावर सोपवलेली इतर सर्व कार्ये पार पाडणे ;

(ड) पूर्वोक्त कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व गोष्टी करणे.

[१][(२) भारतीय वकील परिषद, खालील प्रयोजनार्थ, विहित रीतीने, एक किंवा त्यापेक्षा जास्त निधी घटित करू शकेल :—

(क) निर्धन, विकलांग किंवा इतर अधिवक्त्यासाठी कल्याणकारी योजनांचे आयोजन करण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे ;

(ख) याबाबत तयार केलेल्या नियमांनुसार विधिविषयक सहाय्य किंवा सल्ला देणे ;

[२][ (ग) कायदेविषयक ग्रंथालये स्थापन करणे.]

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषद, कोणतेही अनुदान, देणग्या, दाने किंवा धर्मदाने स्वीकारू शकेल व ती त्या पोटकलमाअन्वये घटित झालेल्या समुचित निधीमध्ये किंवा निधींमध्ये जमा केली जातील.]

**आंतरराष्ट्रीय निकायांमध्ये सदस्यत्व.**

[३][**७क.** भारतीय वकील परिषद, आंतरराष्ट्रीय वकील अधिसंघ किंवा आंतरराष्ट्रीय विधिविषयक सहाय्य अधिसंघ अशा सारख्या आंतरराष्ट्रीय विधिविषयक निकायांचा सदस्य होऊ शकेल, अशा निकायांना, वर्गणीच्या रूपाने किंवा अन्यथा, तिला योग्य वाटेल अशी रक्कम अंशदान म्हणून देऊ शकेल आणि कोणतेही आंतरराष्ट्रीय विधिविषयक संमेलन किंवा चर्चासत्र यांमध्ये तिच्या प्रतिनिधीच्या सहभागावर होणाऱ्या खर्चास अधिकृत मंजुरी देऊ शकेल.]

**राज्य वकील परिषदेच्या सदस्यांचा पदावधी.**

[४][**८.** राज्य वकील परिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांचा (कलम ५४ मध्ये निर्देशित केलेले, निवडून आलेले तिचा सदस्य खेरीजकरून) पदावधी त्यांच्या निवडणुकीच्या निकालाच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून पाच वर्षांचा असेल :

परंतु, राज्य वकील परिषद उक्त पदावधीच्या समाप्तीपूर्वी तिच्या सदस्यांची निवडणूक घेण्यास चुकली तर, भारतीय वकील परिषद, आदेशाद्वारे, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत, उक्त पदावधी, त्याची कारणे लेखी नमूद करून वाढवू शकेल.

**निवडणुकीच्या अभावी विशेष समिती घटित करणे.**

**८क.** (१) जर राज्य वकील परिषद, तिच्या सदस्यांची निवडणूक, पाच वर्षांच्या पदावधीच्या समाप्तीपूर्वी, किंवा, यथास्थिति, कलम ८ मध्ये निर्देशिल्याप्रमाणे वाढविलेल्या पदावधीच्या समाप्तीपूर्वी घेण्यात चुकली तर, अशा समाप्तीच्या दिवसाच्या लगतनंतरच्या दिवशी किंवा त्या दिनांकापासून भारतीय वकील परिषद या अधिनियमान्वये, राज्य वकील परिषदेची कार्ये पार पाडण्याकरिता, वकील परिषद घटित करीपर्यंत, विशेष समिती घटित करील, व ती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल—

(एक) कलम ३ च्या पोटकलम (२) खंड (क) मध्ये निर्देशिलेला राज्य वकील परिषदेचा पदसिद्ध सदस्य, जो अध्यक्ष असेल :

परंतु, एकापेक्षा अधिक पदसिद्ध सदस्य असल्यास त्यांपैकी ज्येष्ठतम सदस्य हा अध्यक्ष असेल ; आणि

(दोन) भारतीय वकील परिषदेने राज्य वकील परिषदेच्या अधिवक्ता मतदार यादीतून नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य.

(२) विशेष समिती घटित झाल्यावर आणि राज्य वकील परिषद घटित होईपर्यंत,—

(क) राज्य वकील परिषदेकडील सर्व निहित मालमत्ता व भत्ता विशेष समितीकडे निहित असतील ;

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ७ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] १९९३ चा अधिनियम ७०, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ८ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] १९९३ चा अधिनियम ७०, कलम ४ द्वारे मूळ अधिनियमाच्या कलम ८ ऐवजी नवीन कलम ८ व कलम ८क समाविष्ट केले (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

(ख) राज्य वकील परिषदेचे सर्व अधिकार, दायित्वे व बंधने ही—मग ती कोणत्याही संविदेतून किंवा अन्यथा निर्माण झालेली असोत—विशेष समितीची बंधने, अधिकार व दायित्वे असतील ;

(ग) राज्य वकील परिषदेपुढे प्रलंबित असलेल्या शिस्तविषयक कोणत्याही बाबीसंबंधातील किंवा अन्य प्रकारच्या सर्व कार्यवाही विशेष समितीकडे हस्तांतरित होतील.

(३) पोटकलम (१) अन्वये घटित झालेली विशेष समिती, भारतीय वकील परिषद यासंबंधात देईल अशा निदेशांना अनुसरून, पोटकलम (१) अन्वये ती घटित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, राज्य वकील परिषदेच्या निवडणुका घेईल आणि जर, विशेष समितीला उक्त सहा महिन्यांच्या आत कोणत्याही कारणाने निवडणुका घेणे शक्य नसेल, तर भारतीय वकील परिषद उक्त कालावधी वाढवू शकेल व त्याची कारणे लेखी नमूद करील.]

शिस्तविषयक समिती.

[१][९. (१) वकील परिषद, एक किंवा त्यापेक्षा अधिक शिस्तविषयक समित्या घटित करील व त्यातील प्रत्येक समिती तीन व्यक्तींची मिळून बनलेली असेल, ज्यातील दोन व्यक्ती परिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडलेल्या असतील आणि तिसरी व्यक्ती ही, कलम ३ च्या पोटकलम (२) मधील परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता असलेली अशी व जे परिषदेचे सदस्य नाहीत अशा अधिवक्त्यांमधून परिषदेने स्वीकृत केलेली अशी व्यक्ती असेल, आणि शिस्तविषयक समितीच्या सदस्यांपैकी वरिष्ठतम अधिवक्ता हा तिचा अध्यक्ष असेल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९६४ (१९६४ चा २१) याच्या प्रारंभापूर्वी घटित झालेली कोणतीही शिस्तविषयक समिती तिच्यापुढे प्रलंबित असलेली कार्यवाही, जणू काही उक्त अधिनियमाद्वारे हे कलम विशोधित झालेच नाही, असे समजून निकालात काढू शकेल.]

[२][विधिविषयक सहाय्य समित्यांची रचना.

[२][**९क.** (१) वकील परिषद एक किंवा अधिक विधिविषयक सहाय्य समित्या घटित करू शकेल आणि त्यातील प्रत्येक समिती विहित केले असेल त्याप्रमाणे पाचपेक्षा कमी नसेल व नऊपेक्षा जास्त नसेल एवढ्या सदस्यांची मिळून बनलेली असेल.

(२) विधिविषयक सहाय्य समितीच्या सदस्यांची अर्हता, निवडीची पद्धत आणि पदावधी विहित केले असेल त्याप्रमाणे राहील.]

शिस्तविषयक समित्यांव्यतिरिक्त इतर समित्यांची रचना.

**१०.** (१) राज्य वकील परिषद खालील स्थायी समित्या घटित करील, त्या अशा,—

(क) परिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडावयाचे पाच सदस्य मिळून बनणारी कार्यकारी समिती ;

(ख) परिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडावयाचे तीन सदस्य मिळून बनणारी नावनोंदणी समिती.

(२) भारतीय वकील परिषद खालील स्थायी समित्या घटित करील, त्या अशा,—

(क) परिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडावयाचे नऊ सदस्य मिळून बनणारी कार्यकारी समिती ;

(ख) दहा सदस्य मिळून बनणारी निधीविषयक शिक्षण समिती, जीमधील पाच सदस्य परिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडावयाच्या व्यक्ती असतील आणि पाच सदस्य परिषदेने स्वीकृत करावयाच्या व परिषदेच्या सदस्य नसतील अशा व्यक्ती असतील.

(३) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य वकील परिषद आणि भारतीय वकील परिषद त्यांना आवश्यक वाटतील अशा इतर समित्या त्यांच्या सदस्यांमधून घटित करू शकतील.

[३][वकील परिषदा आणि त्यांच्या समित्यांद्वारे केले जाणारे कामकाज.

[३][**१०क.** [४][(१) भारतीय वकील परिषदेची नवी दिल्ली येथे बैठक होईल किंवा ती परिषद ठरवील अशा अन्य ठिकाणी बैठक होईल व त्याची कारणे लेखी नमूद करण्यात येतील.

(२) राज्य वकील परिषदेची मुख्यालयाच्या ठिकाणी बैठक होईल किंवा ती परिषद ठरवील अशा अन्य ठिकाणी बैठक होईल व त्याची कारणे लेखी नमूद करण्यात येतील].

---

[१] १९६४ चा अधिनियम २१, कलम ५ द्वारे कलम ९ च्या ऐवजी दाखल केले.

[२] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ९ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] १९९३ चा अधिनियम ७०, कलम ५ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी समाविष्ट केले (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

(३) वकील परिषदेने घटित केलेल्या शिस्तविषयक समित्यांव्यतिरिक्त इतर समित्यांच्या बैठकी आपापल्या वकील परिषदेच्या मुख्यालयात होतील.

(४) प्रत्येक वकील परिषद आणि तिच्या शिस्तविषयक समित्या वगळून इतर प्रत्येक समिती आपल्या बैठकीमध्ये कामकाज करण्यासंबंधात विहित करण्यात येतील अशा कार्यपद्धतीच्या नियमांचे पालन करतील.

(५) कलम ९ अन्वये घटित करावयाच्या शिस्तविषयक समित्या, विहित करण्यात येईल अशा वेळी व त्या ठिकाणी बैठक घेतील आणि त्यांच्या बैठकीचे कामकाज करण्यासंबंधात विहित करण्यात येईल अशा कार्यवाहीच्या नियमांचे पालन करतील.

**वकील परिषदेच्या सदस्याची अनर्हता.**

[1][[2]**[१०ख.]** वकील परिषदेचा एखादा निवडून आलेला सदस्य, तो जिचा सदस्य आहे अशा वकील परिषदेने, अशा परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना पुरेशा कारणाशिवाय अनुपस्थित असल्याचे घोषित केल्यास किंवा कोणत्याही कारणाने त्याचे नाव वकिलांच्या नामावलीतून काढून टाकल्यास किंवा भारतीय वकील परिषदेने तयार केलेल्या कोणत्याही नियमान्वये त्याला अन्यथा अनर्ह ठरवण्यात आल्यास, त्याने आपले पद रिक्त केल्याचे मानले जाईल.]

**वकील परिषदेचा कर्मचारीवर्ग.**

**११.** (१) प्रत्येक वकील परिषद सचिवाची नेमणूक करील आणि तिला लेखापालाची व आवश्यक वाटतील तितक्या इतर व्यक्तींची तिच्या कर्मचारीवर्गात नेमणूक करता येईल.

(२) सचिव आणि असल्यास लेखापाल यांच्याकडे विहित केल्याप्रमाणे अर्हता असतील.

**लेखे व लेखापरीक्षा.**

**१२.** (१) प्रत्येक वकील परिषद, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने अशी लेखा पुस्तके व इतर पुस्तके ठेवण्याची व्यवस्था करील.

(२) कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ ता १) अन्वये लेखापरीक्षक म्हणून कार्य करण्यासाठी योग्य ती अर्हता असलेल्या लेखापरीक्षकाकडून विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा रीतीने वकील परिषदेच्या लेख्यांचे लेखापरीक्षण केले जाईल.

[3][(३) शक्य असेल तितक्या लवकर, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी, परंतु लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ डिसेंबरच्या आत, राज्य वकील परिषद, तिच्या लेख्यांची प्रत, लेखापरीक्षकांच्या त्यावरील अहवालासहित, भारतीय वकील परिषदेकडे पाठवील आणि ती **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करवील.

(४) शक्य असेल तितक्या लवकर, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी, परंतु लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ डिसेंबरच्या आत, भारतीय वकील परिषद, तिच्या लेख्यांची प्रत, लेखापरीक्षकांच्या त्यावरील अहवालासहित, केंद्र सरकारकडे पाठवील आणि ती **भारताच्या राजपत्रात** प्रकाशित करवील.]

**वकील परिषद आणि तिच्या समित्यांमधील रिक्त पदांमुळे केलेली कार्यवाही विधि अग्राह्य न ठरणे.**

**१३.** वकील परिषद किंवा तिच्या कोणत्याही समितीने केलेल्या कोणत्याही कृतीबाबत परिषदेमध्ये किंवा, यथास्थिति, समितीमध्ये रिक्तपद आहे किंवा तिच्या रचनेमध्ये कोणताही दोष आहे, या केवळ कारणावरून हरकत घेता येणार नाही.

**काही विशिष्ट कारणांमुळे वकील परिषदांच्या निवडणुकीला हरकत घेता येणार नाही.**

**१४.** वकील परिषदेच्या सदस्याच्या निवडणुकीच्या दिनांकाची सूचना जर त्या दिनांकापूर्वी कमीत कमी तीस दिवसांपूर्वी **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेली असेल तर, निवडणुकीत मतदान करण्यास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्या निवडणुकीची योग्य सूचना दिली गेलेली नाही, याच केवळ कारणावरून त्या निवडणुकीस हरकत घेता येणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.**

**१५.** (१) या प्रकरणाच्या प्रयोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी वकील परिषद नियम करू शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, या नियमांत पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल—

---

[1] १९६४ चा अधिनियम २१, कलम ६ द्वारे समाविष्ट केले.

[2] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १० द्वारे नवीन क्रमांक दिला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[3] वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे पोटकलम (३) ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[१][(क) गुप्त मतदान पद्धतीद्वारे वकील परिषदेच्या सदस्यांची निवडणूक, ज्यात टपाल मतपत्राद्वारे मताधिकाराच्या अधिकारांचा वापर ज्या शर्तींच्या अधीन व्यक्ती करू शकत असले त्या शर्ती, मतदार याद्या तयार करणे व तिचे पुनरावलोकन करणे आणि निवडणुकीचा निकाल ज्यारीतीने प्रकाशित करण्यात येईल, ती रीत ;]

[२][* * * * *]

[३][(ग) वकील परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीची पद्धत] ;

(घ) वकील परिषदेच्या [४][किंवा अध्यक्ष किंवा उपाध्यक्षपदाच्या] निवडणुकीच्या विधिग्राह्यतेविषयीच्या शंका व तंटे ज्या रीतीने व ज्या प्राधिकरणाद्वारे अंतिमरीत्या निकालात काढण्यात येतील ती रीत व ते प्राधिकरण.

[५][* * * * *]

(च) वकील परिषदेतील नैमित्तिक रिक्तपदे भरणे ;

(छ) वकील परिषदेच्या अध्यक्षाचे व उपाध्यक्षाचे अधिकार व कर्तव्ये,

[६][(छक) वकील परिषदेद्वारे कलम ६ च्या पोटकलम (२) मध्ये आणि कलम ७ च्या पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले आर्थिक सहाय्य किंवा विधिविषयक सहाय्य किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनार्थ एक किंवा त्यापेक्षा अधिक निधी घटित करणे ;

(छख) निर्धन व्यक्तींना विधिविषयक सहाय्यता आणि सल्ला देण्याचे आयोजित करणे आणि त्या प्रयोजनार्थ समित्या व उपसमित्यांचे गठन व त्यांची कार्ये व त्यांना ज्याबाबत विधिविषयक सहाय्य व सल्ला द्यावयाचा अशा कार्यवाहीचे वर्णन ;]

(ज) वकील परिषदेच्या बैठकी बोलावणे व भरवणे ; [७][* * *] त्यांचे कामकाज चालवणे आणि गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्यांची संख्या ;

(झ) वकील परिषदेच्या कोणत्याही समितीची रचना व कार्ये आणि अशा कोणत्याही समितीच्या सदस्यांचा पदावधी ;

(ञ) अशा कोणत्याही समितीच्या बैठका बोलावणे आणि भरवणे, तिचे कामकाज चालवणे आणि गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्यांची संख्या,

(ट) वकील परिषदेचा सचिव, लेखापाल आणि इतर कर्मचारी यांच्या अर्हता आणि सेवाशर्ती ;

(ठ) वकील परिषदेद्वारे लेखा पुस्तके व इतर पुस्तके ठेवणे ;

(ड) लेखापरीक्षकांची नियुक्ती व वकील परिषदेच्या लेख्यांची लेखापरीक्षा ;

(ढ) वकील परिषदेच्या निधीचे व्यवस्थापन व गुंतवणूक.

(३) राज्य वकील परिषदेने या कलमाअन्वये केलेले नियम भारतीय वकील परिषदेने मान्यता दिल्याशिवाय अंमलात येणार नाहीत.

## प्रकरण तीन

## अधिवक्त्यांना प्रवेश देणे व त्यांची नावनोंदणी करणे

**वरिष्ठ व इतर अधिवक्ते.**

**१६.** (१) अधिवक्त्यांचे दोन वर्ग असतील, ते म्हणजे वरिष्ठ अधिवक्ते आणि इतर अधिवक्ते.

---

१. १९७३ चा अधिनियम ६०, कलम १२ द्वारे खंड (क) च्या ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे खंड (ख) निरसित केला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

३. १९७७ चा अधिनियम ३८, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला (३१ ऑक्टोबर, १९७७ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे किंवा अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षांच्या पदाच्या याऐवजी घातले (३१ ऑक्टोबर, १९७७ रोजी व तेव्हापासून).

५. १९६६ चा अधिनियम २३, कलम ३ द्वारे खंड (ङ) निरसित केला (पूर्वलक्षी प्रभावाने).

६. १९७३ चा अधिनियम ६०, कलम १२ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे काही विशिष्ट शब्द निरसित केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

(२) जर उच्चतम (सर्वोच्च) न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या मते एखादा अधिवक्ता त्याच्या योग्यतेमुळे, [१][त्याच्या वकिलीतली कारकीर्द किंवा कायद्याविषयी त्याचे विशेष ज्ञान व अनुभवामुळे] जर तो अशा पदनिर्देशनाकरिता पात्र आहे तर, त्या अधिवक्त्याच्या संमतीने त्यास वरिष्ठ अधिवक्ता म्हणून पदनिर्देशित केले जावू शकते.

(३) वरिष्ठ अधिवक्ता, त्यांच्या वकिली व्यवसायाच्या बाबतीत, भारतीय वकील परिषद, विधिविषयक व्यवसायाच्या हितसंबंधाच्या दृष्टीने विहित करील अशा निर्बंधाच्या अधीन असेल.

(४) सर्वोच्च न्यायालयाचा एखादा अधिवक्ता, जो नियत दिवसाच्या लगतपूर्वी न्यायालयाचा वरिष्ठ अधिवक्ता होतो, तो या कलमाच्या प्रयोजनांसाठी वरिष्ठ अधिवक्ता मानला जाईल :

[२][परंतु, जेव्हा एखादा वरिष्ठ अधिवक्ता, त्याचे नाव ज्यात नोंदलेले आहे अशी नामावली ज्या वकील परिषदेने ठेवलेली असेल तिच्याकडे वरिष्ठ अधिवक्ता म्हणून आणखी राहण्याची त्याची इच्छा नाही, असा ३१ डिसेंबर, १९६५ पूर्वी, अर्ज करील तेव्हा ती वकील परिषद तो अर्ज मंजूर करू शकेल आणि त्यानुसार नामावलीत फेरबदल करील].

**राज्य वकील परिषदांनी अधिवक्त्याची नामावली ठेवणे.**

**१७.** (१) प्रत्येक राज्य वकील परिषद अधिवक्त्यांची नामावली तयार करील व ठेवील आणि त्यात खालील व्यक्तींची नावे व पत्ते नोंदलेले असतील,—

(क) भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये, एखाद्या उच्च न्यायालयाच्या नामावलीमध्ये नियत दिवसाच्या लगतपूर्वी अधिवक्ता म्हणून नोंदणी करण्यात आलेल्या सर्व व्यक्ती तसेच [३][भारताचे नागरिक असलेल्या व भारत सरकार अधिनियम, १९३५ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे ज्या १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारतात समाविष्ट असलेल्या कोणत्याही क्षेत्रामध्ये उक्त दिनांकापूर्वी उक्त अधिनियमान्वये अधिवक्ता म्हणून नोंदवण्यात आलेल्या आणि ज्या कोणत्याही वेळी] वकील परिषदेच्या अधिकारिता क्षेत्रामध्ये व्यवसाय करण्याची इच्छा विहित रीतीने व्यक्त करतील अशा व्यक्ती ;

(ख) ज्या व्यक्ती नियत दिवशी किंवा त्या नंतर या अधिनियमान्वये राज्य वकील परिषदेच्या नामावलीमध्ये अधिवक्ता म्हणून दाखल करून घेतलेल्या असतील अशा इतर सर्व व्यक्ती.

(२) अधिवक्त्यांची प्रत्येक नामावली दोन भाग मिळून बनलेली असेल, पहिल्या भागात वरिष्ठ अधिवक्त्याच्या नावाचा समावेश असेल आणि दुसऱ्या भागात इतर अधिवक्त्यांच्या नावाचा समावेश असेल.

(३) राज्य वकील परिषदेने या कलमान्वये तयार केलेल्या आणि ठेवलेल्या अधिवक्त्याच्या नामावलीच्या प्रत्येक भागातील नोंदी पुढीलप्रमाणे वरिष्ठतेच्या क्रमांकानुसार असतील, [४][आणि भारतीय वकील परिषद या बाबतीत करील अशा कोणत्याही नियमाच्या अधीन राहून अशी वरिष्ठता निश्चित केली जाईल].—

(क) पोटकलम (१) मधील खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेली अधिवक्त्यांची वरिष्ठता ही भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये त्याची नावनोंदणी केलेल्या दिनांकानुसार निश्चित केली जाईल ;

(ख) नियत दिवसाच्या लगतपूर्वी जो सर्वोच्च न्यायालयाचा वरिष्ठ अधिवक्ता असेल अशा कोणत्याही व्यक्तीची वरिष्ठता, राज्य नामावलीच्या पहिल्या भागाच्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषद विनिर्दिष्ट करील अशा तत्त्वानुसार निश्चित केली जाईल ;

[५][* * * * *]

(घ) ज्या व्यक्तीची नियत दिवशी किंवा त्यानंतर वरिष्ठ अधिवक्ता म्हणून नावनोंदणी करण्यात आलेली असेल किंवा जिला अधिवक्ता म्हणून दाखल करून घेतले असेल, अशा नावनोंदणीच्या दिनांकानुसार किंवा, यथास्थिति, दाखल करून घेण्याच्या दिनांकानुसार निश्चित केली जाईल ;

[६][(ङ) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अधिवक्ता म्हणून नाव नोंदलेल्या न्यायवादीची वरिष्ठता (मग ती नाव नोंदणी अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९८० च्या पूर्वी किंवा नंतर झालेली असो,) त्याची न्यायवादी म्हणून नावनोंदणी झाल्याच्या दिनांकानुसार निश्चित केली जाईल.]

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १३ द्वारे अनुभव आणि वकील वर्गातील प्रतिष्ठा या ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] १९६४ चा अधिनियम २१, कलम ८ द्वारे समाविष्ट केले.

[३] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १४ द्वारे आणि जो विहित वेळेत याऐवजी समाविष्ट केले. (३१ जानेवारी १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] १९६४ चा अधिनियम २१, कलम ९ द्वारे आणि अशी वरिष्ठता निश्चित केला जाईल या ऐवजी दाखल केले.

[५] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १४ द्वारे खंड (ग) गाळला (३१ जानेवारी १९७४ रोजी व तेव्हापासून).

[६] १९८० चा अधिनियम ४७, कलम २ द्वारे समाविष्ट केले (२९ नोव्हेंबर १९८० रोजी व तेव्हापासून).

(४) कोणत्याही व्यक्तीची अधिवक्ता म्हणून एकापेक्षा जास्त राज्य वकील परिषदांच्या नामावलीत नावनोंदणी केली जाणार नाही.

एका राज्य नामावलीतून दुसऱ्या राज्य नामावलीकडे नाव स्थानांतरित करणे.

**१८.** (१) कलम १७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या राज्य वकील परिषदेच्या नामावलीमध्ये अधिवक्ता म्हणून नाव नोंदलेली कोणताही व्यक्ती, त्या राज्य वकील परिषदेच्या नामावलीतून तिचे नाव इतर कोणत्याही राज्य वकील परिषदेच्या नामावलीकडे स्थानांतरित करण्यासाठी, भारतीय वकील परिषदेकडे, विहित नमुन्यात अर्ज करू शकेल आणि असा कोणताही अर्ज मिळाल्यानंतर, भारतीय वकील परिषद, अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव, कोणतीही फी न घेता प्रथम उल्लेख केलेल्या राज्य वकील परिषदेच्या नामावलीतून काढून टाकावे व दुसऱ्या राज्य वकील परिषदेच्या नामावलीत नोंदवावे असा निदेश देईल आणि संबंधित वकील परिषद अशा निदेशाचे पालन करील :

[१][परंतु, जिच्या विरुद्ध कोणतीही शिस्तविषयक कार्यवाही प्रलंबित आहे अशा व्यक्तीने स्थानांतरणासाठी अर्ज केला असल्यास, किंवा इतर कोणत्याही कारणामुळे नावाच्या स्थानांतरणासाठीचा अर्ज प्रामाणिकपणाने केला नाही व असे स्थानांतरण करू नये असे भारतीय वकील परिषदेला वाटत असल्यास अर्ज करणाऱ्या व्यक्तीस त्या बाबतीत प्रतिवेदन करण्याची संधी दिल्यानंतर, भारतीय वकील परिषद अर्ज फेटाळू शकेल.]

(२) शंकांचे निरसन करण्यासाठी याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, पोटकलम (१) अन्वये अधिवक्त्याने केलेल्या अर्जावरून, एका राज्य वकील परिषदेच्या नामावलीतून दुसऱ्या राज्य वकील परिषदेच्या नामावलीत त्याच्या नावाने स्थानांतरण करण्यात आले असेल तेव्हा, पूर्वीच्या नामावलीमध्ये जी वरिष्ठता मिळण्यास तो हक्कदार होता, तीच त्याची वरिष्ठता नंतरच्या नामावलीमध्येही कायम ठेवण्यात येईल.

राज्य वकील परिषदेने अधिवक्त्यांच्या नामावलीच्या प्रती भारतीय वकील परिषदेला पाठवणे.

**१९.** प्रत्येक राज्य वकील परिषद, या अधिनियमान्वये तिने पहिल्या वेळी तयार केलेल्या अधिवक्त्यांच्या नामावलीची अधिप्रमाणित प्रत भारतीय वकील परिषदेला पाठवील आणि त्यानंतर अशा नामावलीत फेरबदल केल्यानंतर, भर टाकल्यानंतर, लवकरात लवकर, ते भारतीय वकील परिषदेस कळवील.

[२][सर्वोच्च न्यायालयाच्या विवक्षित अधिवक्त्यांच्या नावनोंदणीसाठी विशेष तरतूद.

**२०.** (१) या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, जो अधिवक्ता नियत दिवसाच्या लगतपूर्वी सर्वोच्च न्यायालयात वकिली व्यवसाय करण्यास हक्कदार होता व ज्याचे नाव कोणत्याही राज्य नामावलीमध्ये नोंदवलेले नाही तो अधिवक्ता राज्य वकील परिषदेच्या नामावलीमध्ये त्याचे नाव नोंदण्याची इच्छा विहित वेळेच्या आत विनिर्दिष्ट नमुन्यात भारतीय वकील परिषदेकडे व्यक्त करू शकेल आणि ते मिळाल्यानंतर भारतीय वकील परिषद निदेश देईल की, प्रत्येक अधिवक्त्यांचे नाव कोणतीही फी न भरता त्या राज्य वकील परिषदेच्या नामावलीमध्ये नोंदले जावे, आणि संबंधित राज्य वकील परिषद अशा निदेशांचे पालन करील.

(२) भारतीय वकील परिषदेने पोटकलम (१) अन्वये दिलेल्या निदेशाचे पालन करण्यासाठी राज्य नामावलीत केलेली कोणतीही नोंद ही, कलम १७ च्या पोटकलम (३) च्या तरतुदींनुसार निश्चित केलेल्या वरिष्ठतेच्या क्रमानुसार केली जाईल.

(३) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एखाद्या अधिवक्त्याने विहित वेळेत त्याची इच्छा व्यक्त न केल्यास किंवा इच्छा व्यक्त करण्यात कसूर केल्यास त्याचे नाव दिल्ली राज्य वकील परिषदेच्या नामावलीत नोंदले जाईल.]

वरिष्ठतेसंबंधी वाद.

**२१.** (१) जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्तींचा वरिष्ठता दिनांक सारखाच असेल तेव्हा वयाने वरिष्ठ असलेल्या व्यक्तीला दुसरी पेक्षा वरिष्ठ समजले जाईल.

[३][(२) पूर्वोक्ताप्रमाणे अधीन राहून कोणत्याही व्यक्तीच्या वरिष्ठतेसंबंधी कोणताही वाद उद्‌भवल्यास, तो संबंधित राज्य वकील परिषदेकडे निर्णयासाठी पाठवला जाईल.]

नावनोंदणी प्रमाणपत्र.

[४][**२२.** (१) राज्य वकील परिषदेने या अधिनियमान्वये ठेवलेल्या अधिवक्त्यांच्या नामावलीमध्ये ज्याच्या नावाची नोंद झाली असेल अशा प्रत्येक व्यक्तीला, राज्य वकील परिषद, विहित नमुन्यातील नावनोंदणी प्रमाणपत्र देईल.

---

[१] १९६४ चा अधिनियम २१, कलम १० द्वारे समाविष्ट केले.

[२] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १५ द्वारे कलम २० च्या ऐवजी दाखल केले. (३१ जानेवारी १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे पोट-कलम (२) ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे पोट-कलम २२ ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी १९७४ रोजी व तेव्हापासून).

(२) राज्य नामावलीमध्ये जिचे नाव नोंदले आहे अशी प्रत्येक व्यक्ती, तिच्या नेहमीच्या निवासस्थानामध्ये झालेला बदल, अशा बदलापासून नव्वद दिवसांच्या आत संबंधित राज्य वकील परिषदेला अधिसूचित करील.]

**पूर्वसुनावणीचा अधिकार.**

**२३.** (१) भारताच्या महान्यायवादीला इतर सर्व अधिवक्त्यांवर पूर्वसुनावणीचा अधिकार असेल

(२) पोटकलम (१) च्या तरतुदींच्या अधीन राहून, भारताच्या सॉलिसिटर-जनरलला इतर सर्व अधिवक्त्यांवर पूर्वसुनावणीचा अधिकार असेल.

(३) पोटकलम (१) व (२) यांच्या तरतुदींच्या अधीन राहून भारताच्या अतिरिक्त सॉलिसिटर-जनरलला इतर सर्व अधिवक्त्यांवर पूर्वसुनावणीचा अधिकार असेल.

[१][(३क) पोटकलमे (१), (२) आणि (३) यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, भारताच्या द्वितीय अतिरिक्त सॉलिसिटर-जनरलला इतर सर्व अधिवक्त्यांवर पूर्वसुनावणीचा अधिकार असेल.].

(४) पोटकलमे (१), [२][(२), (३) आणि (३क)] यांच्या तरतुदींच्या अधीन राहून कोणत्याही राज्याच्या महाअधिवक्त्याला इतर सर्व अधिवक्त्यांवर पूर्वसुनावणीचा अधिकार असेल,

आणि महाअधिवक्त्यांमधील आपापसातील पूर्वसुनावणीचा अधिकार त्या त्या महाअधिवक्त्याच्या वरिष्ठतेनुसार निश्चित केला जाईल.

(५) पूर्वोक्ताच्या अधीन राहून,—

(एक) वरिष्ठ अधिवक्त्यांना कनिष्ठ अधिवक्त्यांवर पूर्वसुनावणीचा अधिकार असेल, आणि

(दोन) वरिष्ठ अधिवक्त्यांमधील आपापसातील पूर्वसुनावणीचा अधिकार आणि कनिष्ठ अधिवक्त्यांमधील आपापसातील पूर्वसुनावणीचा अधिकार त्यांच्या त्यांच्या वरिष्ठतेनुसार निश्चित केला जाईल.

**राज्य नामावलीमध्ये दाखल करून घेतल्या जाऊ शकतील अशा व्यक्ती.**

**२४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या आणि त्या अन्वये केलेल्या नियमांच्या अधीन राहून जर एखादी व्यक्ती खालील शर्तींची पूर्तता करीत असेल तर ती, राज्य नामावलीमध्ये अधिवक्ता, म्हणून दाखल करून घेण्यात अर्ह असेल, त्या शर्ती खालीलप्रमाणे :—

(क) ती भारताची नागरिक असावी :

परंतु या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून इतर देशाचा नागरिक असलेल्या व्यक्तीची अधिवक्ता म्हणून राज्य नामावलीत तेव्हाच नोंदणी केली जाईल जेव्हा त्या देशातील योग्य अर्हता प्राप्त केलेल्या भारतीयांना त्या देशात कायद्याचा व्यवसाय करण्याची अनुमती असेल ;

(ख) तिच्या वयाला एकवीस वर्षे पूर्ण झालेली असावीत ;

(ग) तिने,—

(एक) [३][१२ मार्च, १९६७ पूर्वी] भारताच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही विद्यापीठाकडून ; किंवा

(दोन) १५ ऑगस्ट, १९४७ पूर्वी भारत सरकार अधिनियम, १९३५ द्वारे व्याख्या केल्याप्रमाणे त्या दिनांकापूर्वी भारतात समाविष्ट झालेल्या कोणत्याही क्षेत्रातील विद्यापीठाकडून ; किंवा

[४][(तीन) १२ मार्च, १९६७ नंतर, उपखंड (तीन क) मध्ये तरतूद केलेले असेल ते खेरीजकरून या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ भारतीय वकील परिषदेने मान्यता दिलेल्या भारतातील कोणत्याही विद्यापीठामधून,

कायद्यातील तीन वर्षांच्या पाठ्यक्रमाचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर ; किंवा

(तीन क) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषदेने मान्यता दिलेल्या भारतातील कोणत्याही विद्यापीठामधून, १९६७-६८ या विद्यावर्षापासून किंवा त्याअगोदरच्या कोणत्याही वर्षापासून प्रारंभ होणाऱ्या कमीत कमी दोन विद्यावर्षांचा कालावधी असलेला कायद्यातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर ; किंवा]

[५][(चार) इतर कोणत्याही प्रकरणात, भारतीय वकील परिषदेने या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्या पदवीला मान्यता दिलेली असेल तर भारताच्या राज्यक्षेत्राबाहेरील कोणत्याही विद्यापीठाकडून कायद्यातील पदवी प्राप्त केलेली असावी ; किंवा]

---

[१] १९८० चा अधिनियम ४७, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (२९ नोव्हेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे पोटकलम (२) व (३) ऐवजी दाखल केले (२९ नोव्हेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

[३] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १८ द्वारे "फेब्रुवारी १९६३ च्या २८ व्या दिवसापूर्वी" याऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे उपखंड (तीन) ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[५] १९६४ चा अधिनियम २१, कलम १३ द्वारे समाविष्ट केले.

[१][ती बॅरिस्टर असावी आणि तिला ३१ डिसेंबर, १९७६ रोजी किंवा तत्पूर्वी वकील वर्गात बोलावण्यात आलेले असावे. [२][किंवा ती उच्च न्यायलयाचा मुखत्यार म्हणून नावनोंदणीसाठी, मुंबई किंवा कलकत्ता उच्च न्यायालयाने विनिर्दिष्ट केलेली लेखबद्ध लिपिक होण्याकरिताची किंवा इतर कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झालेली असावी], किंवा या अधिनियमाअन्वये अधिवक्ता म्हणून दाखल करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषदेने मान्यता दिलेली अशी, कायद्याची इतर विदेशी अर्हता मिळवलेली असावी];

[३][* * * * * *]

(ङ) या प्रकरणाअन्वये राज्य वकील परिषदेने केलेल्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे ती इतर शर्ती पूर्ण करीत असावी ;

[४][(च) भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ (१८९९ चा २) अन्वये आकारण्याजोगी नावनोंदणीच्या बाबतीतील फी, मुद्रांक शुल्क, काही असल्यास, आणि राज्य वकील परिषदेला देय असलेले [५][सहाशे रुपये आणि भारतीय वकील परिषदेला, त्या परिषदेच्या नावे काढलेल्या बँक धनाकर्षाच्या रूपाने दीडशे रुपये :]

परंतु, अशी व्यक्ती अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचा सदस्य असल्यास आणि विहित केले असेल अशा प्राधिकाऱ्याकडून तशा अर्थाचे प्रमाणपत्र दाखल केल्यास, राज्य वकील परिषदेला त्यांच्याकडून देय असलेली नावनोंदणी फी [६][शंभर रुपये असेल आणि भारतीय वकील परिषदेला, पंचवीस रुपये असेल.]

[७][**स्पष्टीकरण.—** या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीने भारतीय विद्यापीठाकडून कायद्यातील पदवी मिळवल्याचे त्या दिनांकास मानले जाईल, ज्या दिनांकास विद्यापीठाने त्या पदवी परीक्षेचे निकाल त्याच्या सूचना फलकावर प्रसिद्ध केले असतील किंवा अन्यथा त्याने ती परीक्षा पास केल्याचे जाहीर केले असेल.]

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

[८][कायद्याच्या स्नातक असलेला वकील किंवा प्लीडर] याला, जर त्याने,—

(क) नियत दिवसापासून दोन वर्षांच्या आत, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशा नावनोंदणीसाठी अर्ज केला असेल ; आणि

(ख) पोटकलम (१) चा खंड (क), (ख), (ङ) आणि (च) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पूर्ण केल्या असतील तर,

अधिवक्ता म्हणून राज्य नामावलीमध्ये दाखल करून घेतले जाऊ शकेल.

[९][(३) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी ज्या व्यक्तीने—

(क) [१०][* *] कमीत कमी तीन वर्षांपर्यंत वकील किंवा प्लीडर किंवा मुखत्यार म्हणून काम केले असेल किंवा ज्या कोणत्याही कायद्यान्वये [११][* *] उच्च न्यायालयात (ज्यात पूर्वीच्या भाग " ख " राज्याच्या उच्च न्यायालयाचाही समावेश आहे) किंवा कोणत्याही संघ राज्यक्षेत्रात तिला न्यायिक आयुक्ताच्या न्यायालयात अधिवक्ता म्हणून नावनोंदणी करून घेण्यास हक्क असेल ; किंवा

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १८ द्वारे " तो विधिवक्ता आहे " या ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७६ चा अधिनियम १०७, कलम ६ द्वारे समाविष्ट केले (१५ ऑक्टोबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १८ द्वारे खंड (घ) गाळला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे, मूळ खंड (च) ऐवजी दाखल केला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[५] १९९३ चा अधिनियम ७०, कलम ६ (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[६] वरील अधिनियमाच्या कलम ६ (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[७] १९६२ चा अधिनियम १४, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

[८] १९६४ चा अधिनियम २१, कलम १३ द्वारे विवक्षित शब्दाऐवजी दाखल केले.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी दाखल केले.

[१०] १९६८ चा अधिनियम ३३, कलम २ द्वारे " २९ मार्च, १९६४ च्या ३१ साव्या दिवसापूर्वी " हे शब्द व आकडे गाळले (५ जून, १९६८ रोजी व तेव्हापासून).

[११] वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे " तेव्हा अंमलात असलेला " हे शब्द गाळले (५ जून, १९६८ रोजी व तेव्हापासून).

[१][(कक) १ डिसेंबर, १९६१ पूर्वी, कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधारे अधिवक्त्याव्यतिरिक्त अन्यथा कायद्याचा व्यवसाय (मग तो कार्यार्थ असो किंवा युक्तिवाद म्हणून असो किंवा दोन्ही असो) करण्यास जी हक्कदार असेल, किंवा जी उक्त दिनांकास लोकसेवेमध्ये नसती तर, तशी हक्कदार राहिली असती ; किंवा]

[२][* * * *]

(ग) १ एप्रिल, १९३७ पूर्वी भारत सरकारचा अधिनियम, १९३५ मध्ये धारणा केल्याप्रमाणे ब्रम्हदेशात समाविष्ट झालेल्या कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही उच्च न्यायालयाचा अधिवक्ता असेल ; किंवा

(घ) भारतीय वकील परिषदेने या संदर्भात केलेल्या नियमाअन्वये अधिवक्ता म्हणून नावनोंदणी होण्यास हक्कदार असेल, त्या व्यक्तीस, जर ती,—

(एक) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशा नाव नोंदणीसाठी अर्ज करील तर ; आणि

(दोन) पोटकलम (१) च्या खंड (क), (ख), (ङ) आणि (च) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पूर्ण करीत असेल तर—

अधिवक्ता म्हणून राज्य नामावलीमध्ये दाखल करून घेतले जाऊ शकेल.

[३][* * * * ]

**नाव नोंदणीसाठी अनर्हता.**

[४][२४क. (१) राज्य नामावलीमध्ये अधिवक्ता म्हणून कोणत्याही व्यक्तीला पुढील बाबतीत दाखल करून घेतले जाणार नाही ;

(क) जर ती नैतिक अधोगतीचा अंतर्भाव असलेल्या अपराधांसाठी सिद्धदोषी ठरली असेल तर ;

(ख) जर ती, अस्पृश्यता (अपराध) अधिनियम, १९५५ (१९५५ चा २२) याच्या तरतुदींखालील अपराधांबद्दल सिद्धदोषी ठरली असेल तर ;

[५][(ग) जर तिला, नैतिक अधोगतीचा अंतर्भाव असलेल्या कोणत्यांही आरोपामुळे, राज्याच्या नियंत्रणाखालील नोकरीतून किंवा कार्यालयातून बडतर्फ केलेले किंवा काढून टाकलेले असेल तर.

**स्पष्टीकरण .**— या खंडात, " राज्य " या संज्ञेला, संविधानाच्या अनुच्छेद १२ अन्वये नेमून दिलेला अर्थ असेल :]

परंतु, पूर्वोक्तानुसार नावनोंदणीसाठीची अनर्हता, तिला [६][मुक्त केल्यापासून किंवा बडतर्फ केल्यापासून किंवा, यथास्थिति, काढून टाकण्यात आल्यापासून] दोन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर अंमलात राहणार नाही.

(२) पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट, दोषी असल्याचे आढळून आल्यावर जिच्यावर अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) च्या तरतुदींन्वये कार्यवाही करण्यात आली असेल, त्या व्यक्तीस लागू होणार नाही.

**नावनोंदणीसाठी ज्याच्याकडे अर्ज करावयाचे ते प्राधिकरण.**

**२५.** ज्या राज्य वकील परिषदेच्या अधिकारक्षेत्रात विधिव्यवसाय करण्याचा अर्जदाराचा प्रस्ताव असेल त्या राज्य वकील परिषदेकडे, अधिवक्ता म्हणून समावेश करून घेण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज करण्यात येईल.

**अधिवक्ता म्हणून दाखल करून घेण्यासाठीचे अर्ज निकालात काढणे.**

**२६.** (१) अधिवक्ता म्हणून दाखल करून घेण्यासाठीचा प्रत्येक अर्ज, राज्य वकील परिषद, तिच्या नावनोंदणी समितीकडे पाठवील, आणि पोटकलमे (२) व (३) च्या तरतुदींच्या [७][आणि राज्य वकील परिषद याबाबतीत लेखी देईल अशा कोणत्याही निदेशांच्या अधीन राहून], अशी समिती विहित रीतीने ते अर्ज निकालात काढील :

[७][परंतु, भारतीय वकील परिषद, एकतर तिच्याकडे निर्देश केल्यास किंवा, अन्यथा, कोणत्याही व्यक्तीने अत्यावश्यक वस्तुस्थितीचा विपर्यास करून किंवा कपटाने किंवा गैररीतीने वशिला लावून तिचे नाव अधिवक्त्यांच्या नामावलीमध्ये नोंदवले आहे, अशी तिची खात्री पटल्यास, अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, तिचे नाव अधिवक्त्यांच्या नामावलीमधून काढून टाकील.]

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १८ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे खंड (ख) गाळला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७६ चा अधिनियम १०७, कलम ६ द्वारे गाळले.

[४] १९७३ चा अधिनियम ६०, कलम १९ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[५] १९९३ चा अधिनियम ७०, कलम ७ (एक) द्वारे हा खंड आणि स्पष्टीकरण घातले (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[६] वरील अधिनियमाच्या कलम ७ (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[७] १९६४ चा अधिनियम २१, कलम १४ द्वारे समाविष्ट केले.

(२) राज्य वकील परिषदेची नावनोंदणी समिती जेव्हा असा कोणताही अर्ज नाकारण्याचा प्रस्ताव करील तेव्हा ती, तो अर्ज भारतीय वकील परिषदेकडे अभिप्रायासाठी निर्देशित करील आणि अशा प्रत्येक निर्देशासोबत, तो अर्ज नाकारण्याच्या पुष्ट्यर्थ, कारणांचे विवरण जोडलेले असेल.

(३) राज्य वकील परिषदेची नावनोंदणी समिती, पोटकलम (२) अन्वये भारतीय वकील परिषदेकडे निर्देशित केलेला कोणताही अर्ज, भारतीय वकील परिषदेच्या मताशी अनुरूप राहून निकालात काढील.

[१][(४) राज्य वकील परिषदेच्या नावनोंदणी समितीने तिच्या नामावलीमध्ये अधिवक्ता म्हणून दाखल करून घेण्यासाठी कोणताही अर्ज नाकारल्यास, राज्य वकील परिषद, शक्य तितक्या लवकर, ज्याचा अर्ज नाकारला असेल त्या व्यक्तीचे नाव, पत्ता व अर्हता आणि नकाराची कारणे नमूद करून इतर सर्व राज्य वकील परिषदांना अशा नकाराविषयी कळवील.

[२][नामावलीमधून नाव काढून टाकण्याचा अधिकार.]

[२][**२६क.** राज्य वकील परिषद, जो मरण पावला आहे किंवा ज्याच्याकडून नाव काढून टाकण्याची विनंती करण्यात आलेली आहे, अशा कोणत्याही अधिवक्त्याचे नाव, राज्य नामावलीमधून काढून टाकू शकेल.]

**विवक्षित परिस्थिती वगळता एकदा नाकारलेला अर्ज दुसऱ्या वकील परिषदेद्वारे विचारात घेतला जाऊ नये.**

**२७.** राज्य वकील परिषदेने कोणत्याही व्यक्तीचा अधिवक्ता म्हणून तिच्या नामावलीमध्ये दाखल करून घेण्यासाठी केलेला अर्ज नाकारल्यास, इतर कोणतीही राज्य वकील परिषद, ज्या राज्य वकील परिषदेने अर्ज नाकारला असेल तिची आणि भारतीय वकील परिषदेची लेखी पूर्व संमती घेतल्याशिवाय अशा बाबतीत आपल्या नामावलीमध्ये तिला अधिवक्ता म्हणून दाखल करून घेण्याविषयीचा अर्ज विचारात घेणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.**

**२८.** (१) राज्य वकील परिषद या प्रकरणाच्या उद्देशाची अंमलबजावणी कारण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, असे नियम खालील गोष्टीसाठी तरतूद करतील,—

[३][(क) ज्या वेळेच्या आत आणि ज्या नमुन्यामध्ये अधिवक्ता, कलम २० अन्वये राज्य वकील परिषदेच्या नामावलीमध्ये त्याच्या नावाचा समावेश करण्याची त्याची इच्छा व्यक्त करील ती वेळ व तो नमुना ;]

[४][ * * * *]

(ग) अधिवक्ता म्हणून राज्य वकील परिषदेच्या नामावलीमध्ये समावेश होण्यासाठी राज्य वकील परिषदेकडे करावयाचा अर्ज ज्या नमुन्यात करावयाचा तो नमुना आणि असा अर्ज वकील परिषदेच्या नावनोंदणी समितीद्वारे ज्या रीतीने निकालात काढला जाईल ती रीत ;

(घ) ज्यांच्या अधीन राहून एखाद्या व्यक्तीला अशा कोणत्याही नामावलीमध्ये अधिवक्ता म्हणून दाखल केले जाईल अशा शर्ती ;

(ङ) नावनोंदणी फी भरण्याचे हप्ते.

(३) या प्रकरणाअन्वये केलेले कोणतेही नियम, त्यांना भारतीय वकील परिषदेने मंजुरी दिल्याशिवाय अंमलात येणार नाहीत.

## प्रकरण चार

## विधिव्यवसाय करण्याचा अधिकार

**विधिव्यवसाय करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींचा एकमेव मान्यताप्राप्त वर्ग अधिवक्ता हाच असेल.**

**२९.** या अधिनियमाच्या तरतुदींना व त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून नियत दिवसापासून, विधिव्यवसाय करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींचा फक्त एकच वर्ग असेल तो म्हणजे अधिवक्ता.

---

[१] १९६४ चा अधिनियम २१, कलम १४ द्वारे समाविष्ट केले.

[२] १९७३ चा अधिनियम ६०, कलम २० द्वारे कलम २६क मूळ मजकुराऐवजी दाखल केले. (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम २१ द्वारे खंड (क) मूळ मजकुराऐवजी दाखल केला. (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम २१ द्वारे खंड (ख) गाळला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

**अधिवक्त्यांचा विधिव्यवसाय करण्याचा अधिकार.**

**३०.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून [1][राज्य नामावलीमध्ये] ज्याचे नाव नोंदले आहे, असा प्रत्येक अधिवक्ता, या अधिनियमाचा विस्तार असलेल्या संपूर्ण राज्य क्षेत्रांमधील,—

(एक) सर्वोच्च न्यायालयासहित सर्व न्यायालयांमध्ये ;

(दोन) पुरावा घेण्यासाठी कायदेशीररीत्या प्राधिकृत केलेले कोणतेही न्यायाधिकरण किंवा व्यक्ती यांच्या समोर, आणि

(तीन) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे किंवा अन्वये ज्याच्या समोर असा अधिवक्ता विधिव्यवसाय करण्यास हक्कदार असेल असा कोणताही प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्या समोर विधिव्यवसाय करण्यास हक्कदार असेल.

**३१.** [2][* * * * * ]

**विशिष्ट प्रकरणामध्ये उपस्थित राहण्यास परवानगी देण्याचा न्यायालयाचा अधिकार.**

**३२.** या प्रकरणामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय, प्राधिकारी किंवा व्यक्ती, या अधिनियमाअन्वये अधिवक्ता म्हणून नाव नोंदलेले नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही विशिष्ट प्रकरणामध्ये त्याच्या समोर उपस्थित राहण्याची परवानगी देईल.

**फक्त अधिवक्तेच विधिव्यवसाय करण्यास हक्कदार असतील.**

**३३.** या अधिनियमात किंवा त्या वेळेपुरता अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज नियत दिवशी किंवा त्यानंतर, कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये अधिवक्ता म्हणून नाव नोंदलेली असल्याशिवाय, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणताही प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्या समोर विधिव्यवसाय करण्यास हक्कदार असणार नाही.

**उच्च न्यायालयाचा नियम करण्याचा अधिकार.**

**३४.** (१) ज्याच्या अधीन राहून अधिवक्त्याला उच्च न्यायालयात आणि त्यांच्या दुय्यम न्यायालयांमध्ये विधिव्यवसाय करण्याची परवानगी दिली जाईल, अशा शर्ती निर्धारित करून उच्च न्यायालय नियम करील.

[3][(१क) उच्च न्यायालयातील किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही पक्षकाराद्वारे त्याच्या प्रतिपक्षाच्या अधिवक्त्याच्या सर्व कार्यवाह्यांवरील फीच्या बाबतीत खर्च म्हणून देय असलेली फी, कराधानाद्वारे किंवा अन्यथा निश्चित करण्यासाठी व नियमित करण्यासाठी उच्च न्यायालय नियम करील.]

[4][(२) पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना बाध न येता, कलकत्ता उच्च न्यायालयाला, राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून नाव दाखल करण्याच्या प्रयोजनार्थ, कलम ५८ कछ मध्ये निर्दिष्ट व्यक्तींना उत्तीर्ण करावी लागणारी माध्यमिक आणि अंतिम परीक्षा लेखबद्ध लिपिकांसाठी घेण्याची तरतूद करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित इतर बाबींसाठी नियम करता येतील.]

[5][ * * * * * ]

## प्रकरण पाच

## अधिवक्त्याची वर्तणूक

गैरवर्तणुकीसाठी अधिवक्त्यांना शिक्षा.

**३५.** (१) तक्रार आल्यावरून किंवा अन्यथा राज्य वकील परिषदेला जर असे वाटण्यास कारण असेल की, तिच्या यादीतील कोणताही अधिवक्ता व्यावसायिक किंवा इतर गैरवर्तणुकीबद्दल दोषी आहे तर, ती असे प्रकरण निकालात काढण्यासाठी तिच्या शिस्तविषयक समितीकडे सोपवील.

[6][(१क) राज्य वकील परिषद, स्वतःच्या समावेदनाने किंवा कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने तिच्याकडे केलेल्या अर्जावरून, तिच्या शिस्तविषयक समितीपुढे प्रलंबित असलेली कार्यवाही मागे घेईल आणि त्या राज्य वकील परिषदेच्या इतर कोणत्याही शिस्तविषयक समितीने चौकशी करावी, असा निदेश देईल.]

(२) राज्य वकील परिषदेची शिस्तविषयक समिती [1][* * *] प्रकरणाच्या सुनावणीचा दिनांक निश्चित करील आणि संबंधित अधिवक्ता आणि राज्याचा महाअधिवक्ता यांना तिची नोटीस देण्याची व्यवस्था करील.

---

[1] १९७३ चा अधिनियम ६०, कलम २२ द्वारे "सर्वसामान्य यादी" याऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[2] १९७३ चा अधिनियम १०७, कलम ७ द्वारे कलम ३१ निरसित (३१ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

[3] १९७३ चा अधिनियम ६०, कलम २३ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[4] १९७७ चा अधिनियम ३८, कलम ६ द्वारे समाविष्ट केले (३१ ऑक्टोबर, १९७७ रोजी व तेव्हापासून).

[5] १९७६ चा अधिनियम १०७, कलम ८ द्वारे पोटकलमे (२) व (३) गाळली (१ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

[6] १९७३ चा अधिनियम ६०, कलम २४ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

(३) राज्य वकील परिषदेची शिस्तविषयक समिती, संबंधित अधिवक्ता व महाअधिवक्ता यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर खालीलपैकी कोणताही आदेश काढू शकेल, ते असे :—

(क) तक्रार फेटाळण्यात यावी किंवा, राज्य वकील परिषदेच्या सांगण्यावरून कार्यवाही सुरू केलेली असल्यास, कार्यवाही दाखल करण्याचा निदेश देण्यात यावा ;

(ख) अधिवक्त्याची खरडपट्टी काढावी ;

(ग) तिला योग्य वाटेल अशा कालावधीसाठी अधिवक्त्याला विधिव्यवसाय करण्यापासून निलंबित करण्यात यावे ;

(घ) अधिवक्त्याच्या राज्य नामावलीमधून त्या अधिवक्त्याचे नाव काढून टाकण्यात यावे.

(४) पोटकलम (३) च्या खंड (ग) अन्वये व्यवसाय करण्यापासून अधिवक्त्याला निलंबित केले असेल तेव्हा निलंबनाच्या कालावधीत भारतातील कोणत्याही न्यायालयात किंवा कोणताही प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्यासमेर विधिव्यवसाय करण्यास त्यास मनाई केली जाईल.

(५) पोटकलम (२) अन्वये महाअधिवक्त्याला कोणतीही नोटीस दिली असेल तेव्हा महाअधिवक्ता स्वतः किंवा त्याच्या वतीने उपस्थित राहणाऱ्या कोणत्याही अधिवक्त्यामार्फत, राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीपुढे उपस्थित राहील.

[२][**स्पष्टीकरण.**—या कलमात, व [३][कलम ३७ व कलम ३८] मध्ये दिल्ली संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात, " महाअधिवक्ता " आणि " राज्याचा महाअधिवक्ता " या शब्दप्रयोगांचा अर्थ, भारताचा अतिरिक्त महान्यायाभिकर्ता, असा आहे.]

**भारतीय वकील परिषदेचे शिस्तविषयक अधिकार.**

**३६.** (१) तक्रार आल्यावरून किंवा अन्यथा भारतीय वकील परिषदेला जर असे वाटण्यास कारण असेल की, कोणत्याही राज्य नामावलीत ज्याचे नाव नोंदले नाही असा कोणताही अधिवक्ता [४][ * * * ] व्यावसायिक किंवा इतर गैरवर्तणुकीबद्दल दोषी आहे तरी, ती असे प्रकरण निकालात काढण्यासाठी तिच्या शिस्तविषयक समितीकडे सोपवील.

(२) या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, भारतीय वकील परिषदेची शिस्तविषयक समिती [५][तिच्या स्वतःच्या समावेदनाने किंवा कोणत्याही राज्य वकील परिषदेच्या अहवालावरून किंवा कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने तिच्याकडे केलेल्या अर्जावरून] कोणत्याही राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीपुढे प्रलंबित असलेली कोणत्याही अधिवक्त्याविरुद्धची शिस्तभंगाची कार्यवाही चौकशी करण्यासाठी स्वतःकडे मागे घेईल व ती निकालात काढील.

(३) भारतीय वकील परिषदेची शिस्तविषयक समिती, या कलमान्वये कोणतेही प्रकरण निकालात काढताना, शक्य होईल तितपत, कलम ३५ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करील आणि त्या कलमातील महाअधिवक्त्याच्या निर्देशाचा अर्थ, भारताच्या महान्यायवादीचा निर्देश असल्याप्रमाणे लावला जाईल.

(४) या कलमान्वये कोणतीही कार्यवाही निकालात काढताना, भारतीय वकील परिषदेची शिस्तविषयक समिती, कलम ३५ च्या पोटकलम (३) अन्वये राज्य वकील परिषदेची शिस्तविषयक समिती काढू शकेल असा कोणताही आदेश काढील आणि [६][भारतीय वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीपुढे चौकशी करण्यासाठी] कोणतीही कार्यवाही मागे घेण्यात येईल तेव्हा, संबंधित राज्य वकील परिषद अशा कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करील.

---

१. १९७३ चा अधिनियम ६०, कलम २४ द्वारे " जर ती संक्षेपतः तक्रार फेटाळत नसेल तर " हे शब्द गाळले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम २१, कलम १७ द्वारे समाविष्ट केले.

३. १९७३ चा अधिनियम ६०, कलम २४ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २५ द्वारे " सर्वसामान्य यादीमध्ये " हे शब्द गाळले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम २५ द्वारे " तिच्या स्वतःच्या समावेदनाने " याऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम २५ द्वारे " भारतीय वकील परिषदेपुढे " ऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[१][**३६क.** ज्या ज्या वेळी कलम ३५ किंवा कलम ३६ खालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात राज्य वकील परिषदेची शिस्तविषयक समिती किंवा भारतीय वकील परिषदेची शिस्तविषयक समिती आपली अधिकारिता वापरण्याचे बंद करील आणि जिला अधिकारिता आहे व जी अधिकारितेचा वापर करीत आहे अशी दुसरी एखादी समिती तिच्या जागी येईल, त्यावेळी अशी मागाहून आलेली, किंवा यथास्थिति, राज्य वकील परिषदेची शिस्तविषयक समिती किंवा भारतीय वकील परिषदेची शिस्तविषयक समिती, तिच्या पूर्वधिकारी समितीने ज्या टप्प्यावर कार्यवाही सोडली असेल त्या टप्प्यापासून ती कार्यवाही पुढे चालू करील. **शिस्तविषयक समितीच्या रचनेतील बदल.**

**३६ख.** (१) राज्य वकील परिषदेची शिस्तविषयक समिती, कलम ३५ अन्वये तिच्याकडे आलेली तक्रार त्वरित निकालात काढील आणि प्रत्येक प्रकरणात, तक्रार आल्याच्या दिनांकापासून किंवा, यथास्थिति, राज्य वकील परिषदेच्या सांगण्यावरून कार्यवाही सुरू करण्यात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत अशी कार्यवाही पूर्ण करण्यात येईल व तसे करण्यात कसूर झाल्यास, ती कार्यवाही भारतीय वकील परिषदेकडे हस्तांतरित करण्यात येईल व जणू काही कलम ३६ च्या पोटकलम (२) खाली ती कार्यवाही चौकशीसाठी मागे घेण्यात आल्याप्रमाणे ती निकालात काढण्यात येईल. **शिस्तविषयक कार्यवाही निकालात काढणे.**

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ६०) च्या प्रारंभानंतर, एखाद्या अधिवक्त्याच्या विरुद्ध शिस्तभंगविषयक कोणतीही कार्यवाही राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीसमोर प्रलंबित असेल तर, ती राज्य वकील परिषदेची शिस्तविषयक समिती, त्याचा निकाल अशा प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत किंवा, यथास्थिति, तक्रार प्राप्त झाल्यापासून, राज्य वकील परिषदेच्या सांगण्यावरून कार्यवाही सुरू करण्यात आल्याच्या दिनांकापासून, यांपैकी जो नंतरचा दिनांक असेल त्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत लावील व त्यात कसूर झाल्यास, ती कार्यवाही भारतीय वकील परिषदेकडे पोटकलम (१) अन्वये निकालात काढण्यासाठी पाठविण्यात येईल.]

**३७.** (१) [२][कलम ३५ अन्वये] राज्य वकील परिषदेने [३][किंवा राज्यच्या महाअधिवक्त्याने] दिलेल्या आदेशाने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, त्याला तो आदेश कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, भारतीय वकील परिषदेकडे अपील करू शकेल. **भारतीय वकील परिषदेकडे अपील करणे.**

(२) अशा प्रत्येक अपिलाची भारतीय वकील परिषदेकडून सुनावणी केली जाईल व ती तिला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल [३][त्यात राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने दिलेल्या शिक्षेत बदल करणाराही आदेश असेल] :

[३][परंतु, राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीचा आदेश, भारतीय वकील परिषदेची शिस्तविषयक समिती, व्यथित व्यक्तीस तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, तिला बाधा पोहोचेल असा त्यात बदल करणार नाही.]

**३८.** भारतीय वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने [४][अथवा भारताचा महान्यायवादी, किंवा, यथास्थिति, संबंधित राज्याचा महाअधिवक्ता यांनी] कलम ३६ अथवा कलम ३७ अन्वये दिलेल्या आदेशाने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, तिला तो आदेश कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, सर्वोच्च न्यायालयाकडे अपील दाखल करू शकेल आणि सर्वोच्च न्यायालय त्यावर त्यास योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल. [४][त्यात, भारतीय वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने दिलेल्या शिक्षेत बदल करणारा आदेशही असेल]: **सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करणे.**

[४][परंतु, भारतीय वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीचा आदेश, सर्वोच्च न्यायालय, ज्यामुळे व्यथित व्यक्तीस तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, तिला बाधा पोहचेल असा त्यात बदल करणार नाही.]

[५][**३९.** मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) यांच्या कलम ५ आणि १२ च्या तरतुदी शक्य होईल तेथवर, कलम ३६ व ३८ खाली लागू करण्यात येतील.] **१९६३ च्या मुदत अधिनियमातील कलम ५ आणि १२ लागू करणे.**

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम २६ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).
[२] १९६४ चा अधिनियम २१, कलम १८ द्वारे "कलम ३५ च्या पोटकलम (३)" ऐवजी समाविष्ट केले.
[३] १९७३ चा अधिनियम ६०, कलम २७ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).
[४] वरील अधिनियमाच्या कलम २८ द्वारे दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).
[५] वरील अधिनियमाच्या कलम २९ द्वारे दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

आदेशांची स्थगिती.

४०. [१][(१)] कलम ३७ किंवा कलम ३८ खाली करण्यात आलेले अपील हे, ज्याविरूद्ध अपील केले असेल त्या आदेशांची स्थगिती म्हणून वापरले जाणार नाही, परंतु, यथास्थिति, भारतीय वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीस किंवा सर्वोच्च न्यायालयास, पुरेशा कारणाकरिता त्यास योग्य वाटतील अशा अटी आणि शर्तींवर अशा आदेशाच्या स्थगितीचा निदेश देता येईल.

[२][(२) जर कलम ३७ अथवा कलम ३८ अन्वये परवानगी दिलेल्या कालावधीच्या समाप्तीपूर्वी, आदेशाच्या स्थगितीकरिता अर्ज दाखल केला असेल तर, यथास्थिति राज्य वकील परिषदेची शिस्तविषयक समिती अथवा भारतीय वकील परिषदेची शिस्तविषयक समिती, पुरेशा कारणाकरिता, तिला योग्य वाटतील अशा अटी आणि शर्तींवर, अशा आदेशाच्या स्थगितीचा निदेश देईल.]

अधिवक्त्यांच्या नामावलीत फेरबदल करणे.

४१. (१) जेव्हा या प्रकरणान्वये, एखाद्या अधिवक्त्यावर ताशेरे झाडणारा अथवा त्याला निलंबित करणारा आदेश देण्यात आला असेल तर त्याच्या नावासमोर पुढीलप्रमाणे शिक्षेची नोंद करण्यात येईल :—

(क) ज्या अधिवक्त्याचे नाव राज्य नामावलीत दाखल करण्यात आले असेल त्या प्रसंगी त्या नामावलीत,

[३][ * * * * * ]

आणि जर देण्यात आलेल्या आदेशामुळे एखाद्या अधिवक्त्यास त्याच्या विधिव्यवसायापासून दूर करण्यात आले असले तर, त्याचे नाव राज्य नामावलीमधून काढून टाकण्यात येईल. [४][ * * * ]

[५][ * * * * * ]

(३) जर कोणत्याही अधिवक्त्यास व्यवसायापासून निलंबित करण्यात आले असेल अथवा दूर करण्यात आले असेल तर, कलम २२ अन्वये त्यास प्रदान करण्यात आलेले त्याच्या नावनोंदणी विषयीचे प्रमाणपत्र परत मागवण्यात येईल.

शिस्तविषयक समितीचे अधिकार.

४२. (१) वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीला, पुढील बाबींच्या संबंधात दिवाणी न्यायालयास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये विहित करण्यात आलेले अधिकार असतील :—

(क) कोणत्याही व्यक्तीस उपस्थित राहण्यास फर्मावणे व भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी घेणे ;

(ख) कोणतेही दस्तऐवज शोधून सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) प्रतिज्ञापत्रावर पुरावा घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून अथवा कार्यलयाकडून कोणत्याही सार्वजनिक अभिलेखाची अथवा त्यांच्या प्रतींची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांच्या अथवा दस्तऐवजांच्या तपासणीकरिता आयोगपत्रे काढणे ;

(च) विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही बाबी :

परंतु, अशा शिस्तविषयक समितीस पुढील व्यक्तींना उपस्थित राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार असणार नाही,—

(क) एखादे न्यायालय ज्या उच्च न्यायालयाला दुय्यम असेल अशा उच्च न्यायालयाच्या पूर्वमंजुरीखेरीज त्या न्यायालयाचा कोणताही पीठासीन अधिकारी ;

(ख) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीखेरीज महसूल न्यायालयाचा कोणताही अधिकारी.

(२) वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीसमोरील प्रत्येक कार्यवाही ही, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलमे १९३ व २२८ च्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि, अशी प्रत्येक शिस्तविषयक समिती, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८[६] (१८९८ चा ५) च्या कलमे ४८०, ४८२ आणि ४८५ च्या प्रयोजनांसाठी दिवाणी न्यायालय असण्याचे मानण्यात येईल.

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३०, पोटकलम (१) अन्वये कलम ४० ला नव्याने क्रमांक देण्यात आला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे खंड (ख) वगळण्यात आला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे काही विशिष्ट शब्द वगळण्यात आले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे पोट-कलम (२) वगळण्यात आले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[६] फोजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), कलम ३४५ (१), ३४६ व ३४९ पहा.

(३) पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याच्या प्रयोजनाकरिता, या अधिनियमाचा विस्तार ज्या प्रदेशांमध्ये असेल अशा प्रदेशातील कोणत्याही "दिवाणी न्यायालयाला," शिस्तविषयक समिती साक्षीदाराच्या उपस्थितीकरिता अथवा समितीस आवश्यक असलेले दस्तऐवज सादर करण्याकरिता समन्स किंवा इतर आदेशिका किंवा तिला आवश्यक वाटतील अशी आयोगपत्रे पाठवील, आणि दिवाणी न्यायालय, अशा आदेशिकेची बजावणी करण्याची किंवा, यथास्थिति, आयोगपत्रे पाठवण्याची व्यवस्था करील, आणि अशी कोणतीही आदेशिका जणू काही त्याच्यासमोर उपस्थित होण्यासाठी किंवा सादर करण्यासाठी असलेली आदेशिका असल्याप्रमाणे तिची अंमलबजावणी करील.

[१][(४) शिस्तविषयक समितीसमोर सुनावणी होण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास तिचा अध्यक्ष अथवा तिचा कोणताही सदस्य अनुपस्थित असले तरीसुद्धा, जर शिस्तविषयक समितीस योग्य वाटेल तर, ती अशा नियतदिवशीची कार्यवाही आयोजित करील अथवा चालू ठेवील आणि अशी कोणतीही कार्यवाही किंवा अशा कोणत्याही कार्यवाहीत, शिस्तविषयक समितीने दिलेला कोणताही आदेश, अशा कोणत्याही दिवशी, अध्यक्ष अथवा त्यातील कोणताही सभासद उपस्थित नव्हता, केवळ या कारणावरून विधिअग्राह्य समजण्यात येणार नाही :

परंतु, शिस्तविषयक समितीचा अध्यक्ष व इतर सभासद उपस्थित असल्याखेरीज ; कलम ३५ च्या पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या स्वरूपाचा कोणताही अंतिम आदेश देण्यात येणार नाही.

(५) एखाद्या कार्यवाहीत जेव्हा, कलम ३५ च्या पोटकलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या स्वरूपाचा कोणताही अंतिम आदेश देणे शिस्तविषयक समितीच्या अध्यक्षांच्या मते किंवा सदस्यांच्या मते, त्यांच्यातील बहुमताच्या अभावामुळे किंवा अन्य कारणामुळे शक्य नसेल तेव्हा, ते प्रकरण त्यांच्या त्यावरील अभिप्रायासह संबंधित वकील परिषदेच्या अध्यक्षासमोर अथवा जर वकील परिषदेचा अध्यक्ष हा शिस्तविषयक समितीचा अध्यक्ष म्हणून किंवा सदस्य म्हणून काम करीत असेल तर, वकील परिषदेच्या उपाध्यक्षासमोर मांडण्यात येईल आणि वकील परिषदेचा उक्त अध्यक्ष किंवा, यथास्थिति, उपाध्यक्ष त्यास योग्य वाटेल अशी सुनावणी केल्यानंतर त्याचे मत देईल आणि शिस्तविषयक समितीचा अंतिम आदेश त्या मतानुसार असेल.]

**भारतीय वकील परिषद आणि इतर समित्यांचे अधिकार.**

[२][**४२क.** कलम ४२ च्या तरतुदी शक्य होईल तितपत भारतीय वकील परिषद, नावनोंदणी समिती, निवडणूक समिती, विधिविषयक सहाय्य समिती अथवा वकील परिषदेची इतर कोणतीही समिती, यांच्या संबंधात जसे ते वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीच्या संबंधात लागू होतात, त्याप्रमाणे लागू होतील.]

**शिस्तविषयक समितीसमोरील कार्यवाहीचा वादखर्च.**

**४३.** वकील परिषद शिस्तविषयक समिती, तिच्यासमोर चालणाऱ्या कार्यवाहीच्या वादखर्चाबद्दल तिला योग्य वाटेल असा आदेश देईल आणि अशा कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी, तो आदेश पुढीलप्रमाणे होता असे मानून करण्यात येईल :—

(क) भारतीय वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने दिलेल्या आदेशासंबंधात, सर्वोच्च न्यायालयाचा आदेश असल्याप्रमाणे ;

(ख) राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने दिलेल्या आदेशासंबंधात, उच्च न्यायालयाचा आदेश असल्याप्रमाणे.

**शिस्तविषयक समितीकडून आदेशांचे पुनर्विलोकन.**

**४४.** वकील परिषदेची शिस्तविषयक समिती स्वत:हून किंवा अन्य प्रकारे तिने या प्रकरणान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे [३][त्या आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत] पुनर्विलोकन करील :

परंतु, भारतीय वकील परिषदेने मान्यता दिल्याखेरीज, राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने अशा कोणत्याही आदेशाचे केलेले पुनर्विलोकन परिणामकारक मानण्यात येणार नाही.

## प्रकरण सहा

## संकीर्ण

**न्यायालयात आणि इतर प्राधिकरणा-समोर अवैधतेने विधिव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना शास्ती.**

**४५.** जी व्यक्ती, कोणत्याही न्यायालयामध्ये अथवा प्राधिकरण वा व्यक्ती यांच्यासमोर तिला विधिव्यवसाय करण्याचा या अधिनियमातील तरतुदींनुसार हक्क नसताना विधिव्यवसाय करीत असेल तिला सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल.

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३२ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३३ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[१][४६. निरसित.]

**राज्य वकील परिषदेस वित्तीय सहाय्य.** [२][४६क. कोणत्याही राज्य वकील परिषदेस या अधिनियमाखालील तिच्या कर्तव्यांचे पालन करण्याच्या प्रयोजनाकरिता निधीची आवश्यकता आहे, याबद्दल जर भारतीय वकील परिषदेची खात्री झाली असेल तर, ती, तिला योग्य वाटेल असे आर्थिक सहाय्य त्या वकील परिषदेस अनुदानाच्या स्वरूपात अथवा अन्य प्रकारे देईल.]

**देवाणघेवाण.** **४७.** (१) केंद्र सरकारने, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्यासंदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही देशाने, जर भारताच्या नागरिकास विधिव्यवसाय करण्यास प्रतिबंध केला असेल किंवा त्यांच्याविषयी त्या देशात अनुचित भेदभाव दर्शविला असेल तर, अशा देशाच्या कोणत्याही नागरिकास भारतात विधिव्यवसाय करण्याचा हक्क देण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून भारतीय वकील परिषद, भारतीय नागरिकां-व्यतिरिक्त इतर व्यक्तींनी विदेशातून मिळवलेली कायद्याची अर्हता, या अधिनियमान्वये अधिवक्ता म्हणून प्रवेश देण्याच्या प्रयोजनार्थ ज्या शर्तींना अधीन राहून मान्यताप्राप्त समजण्यात येईल, त्या शर्ती विहित करील.

**विधिविषयक कार्यवाह्यांविरुद्ध हानिरक्षण.** **४८.** कोणतीही वकील परिषद अथवा तिची कोणतीही समिती अथवा वकील परिषदेच्या [३][अथवा तिच्या कोणत्याही समितीचा] सदस्य यांनी या अधिनियमातील अथवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींच्या अनुरोधाने सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल त्यांच्याविरुद्ध कोणताही दावा अथवा इतर विधिविषयक कार्यवाही करण्यात येणार नाही.

**[४][पुनरीक्षणाचा अधिकार.** **४८क.** (१) राज्य वकील परिषदेने किंवा तिच्या कोणत्याही समितीने या अधिनियमानुसार निकालात काढलेल्या व ज्याविरुद्ध कोणतेही अपील दाखल होऊ शकत नाही अशा कोणत्याही कार्यवाहीचे अभिलेख, भारतीय वकील परिषदेला अशा निकालाच्या वैधतेविषयी अथवा औचित्याविषयी स्वतःची खात्री करून घेण्याच्या हेतूने कोणत्याही वेळी मागवता येतील आणि तिला योग्य वाटतील असे त्या संबंधात आदेश देता येतील.

(२) एखाद्या व्यक्तीला बाधक ठरेल असा कोणताही आदेश, त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, या कलमाखाली दिला जाणार नाही.]

**[५][पुनर्विलोकन.** **४८.कक.** भारतीय वकील परिषद किंवा तिच्या शिस्तविषयक समितीखेरीज इतर कोणत्याही समित्या, त्यांनी या अधिनियमाखाली संमत केलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन त्या आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत स्वतःहून अथवा अन्यथा करतील.]

**निदेश देण्याचा अधिकार.** **४८ख.** (१) राज्य वकील परिषदेची किंवा तिच्या इतर कोणत्याही समितीची कामे योग्य व परिणामकारकरीत्या पार पाडली जावीत म्हणून, भारतीय वकील परिषद तिच्या सर्वसाधारण पर्यवेक्षकीय आणि नियंत्रक अधिकाराची वापर करून तिला आवश्यक वाटतील असे निदेश राज्य वकील परिषदेस अथवा तिच्या कोणत्याही समितीस देईल आणि राज्य वकील परिषद किंवा तिची समिती, त्या निदेशांचे पालन करील.

(२) जेव्हा राज्य वकील परिषद कोणत्याही कारणामुळे का होईना तिच्या कर्तव्याचे पालन करण्यातस असमर्थ असेल तेव्हा भारतीय वकील परिषद, पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाधा न आणता, तिला अत्यावश्यक वाटतील असे निदेश त्यातील पदसिद्ध अधिकाऱ्यास देईल आणि राज्य वकील परिषदेने केलेल्या नियमात काहीही समाविष्ट असेल तरी, असे निदेश परिणामक असतील.

---

[१] १९७३ चा अधिनियम ७०, कलम ८ द्वारे निरसित (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).
[२] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३५ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).
[३] वरील अधिनियमाच्या कलम ३६ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).
[४] १९६४ चा अधिनियम २१, कलम १९ द्वारे समाविष्ट केले.
[५] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३७ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

**भारतीय वकील परिषदेचा नियम करण्याचा सर्वसाधारण अधिकार.**

४९. [१][(१)] भारतीय वकील परिषद या अधिनियमानुसार तिची कामे पार पाडण्याकरिता नियम करू शकेल आणि अशा नियमात विशेष करून पुढील गोष्टी विहित करता येतील,—

[२][(क) राज्य वकील परिषदेच्या निवडणुकीत अधिवक्त्यास ज्यांच्या अधीन राहून मत देण्याबाबतचे हक्क असतील त्या शर्ती तसेच मतदारांच्या अर्हता अथवा अनर्हता, आणि राज्य वकील परिषद ज्या रीतीने मतदार यादी तयार करील आणि सुधारील ती रीत ;

(कख) वकील परिषदेच्या सदस्यत्वाकरिताची अर्हता आणि अशा सदस्यत्वाकरिताची अनर्हता ;

(कग) कलम ३ च्या पोटकलम (२) मधील परंतुक ज्या वेळेत आणि ज्या रीतीने अंमलात आणावयाचे ती वेळ व ती रीत ;

(कघ) कोणत्याही अधिवक्त्यांचे नाव, एकापेक्षा जास्त राज्य नामावलीत नोंद करण्यास ज्या रीतीने प्रतिबंध करावयाचा ती रीत ;

(कङ) अधिवक्त्यामधील वरिष्ठता ज्या रीतीने निर्धारित करण्यात येईल, ती रीत ;

[३][(कच) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठात कायद्यामधील पदवी पाठ्यक्रमाकरिताच्या प्रवेशाकरिता किमान आवश्यक अर्हता ;]

(कछ) अधिवक्ता म्हणून नाव दाखल करण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीचे वर्ग अथवा प्रवर्ग ;

(कज) अधिवक्त्यास ज्यांच्या अधीन राहून विधिव्यवसाय करण्याचा हक्क असेल अशा शर्ती आणि ज्या परिस्थितिमध्ये एखादी व्यक्ती न्यायालयात अधिवक्ता म्हणून विधिव्यवसाय करीत आहे असे मानण्यात येईल, ती परिस्थिति ;]

(ख) एखाद्या अधिवक्त्याचे नाव एका राज्य नामावलीतून दुसऱ्या राज्य नामावलीत स्थानांतरित करण्याविषयी आवेदन ज्या नमुन्यात करण्यात येईल तो नमुना ;

(ग) अधिवक्त्यांकडून राखण्यात येणारा विधिव्यावसायिक वर्तणुकीचा दर्जा आणि पाळण्यात येणारे शिष्टाचार ;

(घ) विधिविषयक शिक्षणाच्या बाबतीत भारतातील विद्यापीठांनी राखलेला दर्जा आणि त्या प्रयोजनाकरिता विद्यापीठांचे निरीक्षण ;

(ङ) भारताच्या नागरिकाखेरीज इतर व्यक्तींनी प्राप्त केलेली कायद्यातील जी विदेशी अर्हता या अधिनियमातील तरतुदींनुसार अधिवक्ता म्हणून प्रवेश देण्यास मान्यता प्राप्त समजली जाईल, ती अर्हता ;

(च) राज्य वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने आणि तिच्या स्वतःच्या शिस्तविषयक समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(छ) विधिव्यवसायाच्या बाबतीत ज्या निर्बंधांच्या अधीन वरिष्ठ अधिवक्ते असतील ते निर्बंध ;

[४][(छछ) कोणत्याही न्यायालयासमोर किंवा प्राधिकरणासमोर हजर होताना अधिवक्त्यांना हवामानाच्या स्थितिप्रमाणे घालावयाच्या पोषाखांचे किंवा अधिकारवस्त्रांचे नमुने ;]

(ज) या अधिनियमाखालील कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत आकारण्यात यावयाचे शुल्क ;

[५][(झ) राज्य वकील परिषदेच्या मार्गदर्शनाकरिता सर्वसाधारण तत्त्वे आणि भारतीय वकील परिषदेने दिलेल्या निदेशांची किंवा आदेशांची अंमलबजावणी ज्या रीतीने करण्यात येईल, ती रीत ;

(ञ) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब :]

[६][परंतु, खंड (ग) अथवा (छछ) च्या संदर्भात करण्यात आलेले नियम हे भारताच्या मुख्य न्यायमूर्तीने त्यांना मान्यता दिल्याखेरीज अंमलात आणण्यात येणार नाहीत.] :

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३८ द्वारे कलम ४९ ला पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] १९६४ चा अधिनियम २१, कलम २० द्वारे खंड (क) समाविष्ट केला.

[३] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३८ द्वारे खंड (कच) ऐवजी समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[५] १९६४ चा अधिनियम २१, कलम २० द्वारे खंड (झ) ऐवजी समाविष्ट केले.

[६] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३८ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[१][परंतु, आणखी असे की,] खंड (ङ) च्या संदर्भात करण्यात आलेले नियम, केंद्र सरकारने त्यांना मान्यता दिल्याखेरीज अंमलात आणण्यात येणार नाहीत ;

[२][(२) पोटकलम (१) च्या पहिल्या परंतुकात काहीही अंतर्भूत असले तरी उक्त पोटकलमाच्या खंड (ग) किंवा खंड (छछ) च्या संदर्भानुसार केलेले कोणतेही नियम आणि अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ६०) याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले नियम या अधिनियमातील तरतुदीच्या अनुसार फेरफार करीपर्यंत अथवा निरसित करीपर्यंत अथवा विशोधित करीपर्यंत अंमलात राहतील.]

[३][केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.

**४९क.** (१) केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेनुसार, या अधिनियमातील प्रयोजने अंमलात आणण्याकरिता ज्या कोणत्याही बाबींच्या बाबत भारतीय वकील परिषदेस अथवा राज्य वकील परिषदेस नियम करण्याचा अधिकार असेल, त्या बाबीकरिता नियम करील.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, खालील गोष्टीकरिता अशा नियमात तरतूद करता येईल,—

(क) वकील परिषदेच्या सदस्याकरिताची अर्हता आणि अशा सदस्यात्वाकरिताची अनर्हता ;

(ख) ज्या रीतीने भारतीय वकील परिषद राज्य वकील परिषदेवर पर्यवेक्षण व नियंत्रण करील ती रीत आणि भारतीय वकील परिषदेने दिलेले निदेश व आदेश ज्या रीतीने अंमलात आणले जातील ती रीत ;

(ग) या अधिनियमाखाली अधिवक्ता म्हणून नाव नोंदण्याचा हक्क असणाऱ्या व्यक्तींचा वर्ग अथवा प्रवर्ग ;

(घ) कलम २४, पोटकलम (१), खंड (घ) अनुसार विहित केलेला प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करण्यातून व परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आलेल्या व्यक्तींचा प्रवर्ग ;

(ङ) अधिवक्त्यामधील वरिष्ठता ज्या रीतीने ठरविण्यात येईल ती रीत ;

(च) वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने खटल्यांच्या सुनावणीकरिता अनुसरावयाची कार्यपद्धती आणि भारतीय वकील परिषदेच्या शिस्तविषयक समितीने अपिलांच्या सुनावणीकरिता अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(छ) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमाखालील नियम, एकतर संपूर्ण भारताकरिता किंवा सर्व किंवा कोणत्याही वकील परिषदेकरिता करण्यात येतील.

(४) जर वकील परिषदेने केलेली नियमांतील कोणतीही तरतूद केंद्र सरकारने या कलमाखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी उपबंधांशी प्रतिकूल असेल तर, या कलमाखालील नियम—मग तो वकील परिषदेने केलेल्या नियमाच्या अगोदर केलेला असो किंवा नंतर केलेला असो—अधिभावित होईल, आणि वकील परिषदेने केलेला नियम जेथवर तो प्रतिकूल असेल तेथवर शून्यवत ठरेल.

[४][(५) या कलमाखालील केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

विवक्षित अधिनियमितींचे निरसन.

**५०.** (१) या अधिनियमान्वये राज्य वकील परिषद घटित झाल्याच्या दिनांकापासून भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) याची कलमे ३ ते ७ (दोन्ही धरून), कलम ९ ची पोटकलमे (१), (२) आणि (३), कलम १५ आणि कलम २० यांच्या तरतुदी राज्य वकील परिषद ज्या प्रदेशाकरिता घटित केली असेल त्या प्रदेशात निरसित झाल्याचे मानण्यात येईल.

---

[१] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३८ द्वारे "परंतु" या मजकुराऐवजी दाखल केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

[३] १९६४ चा अधिनियम २१, कलम २१ द्वारे समाविष्ट केले.

[४] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ३९ द्वारे पोट-कलम (५) ऐवजी समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

(२) प्रकरण तीन अंमलात आल्याच्या दिनांकास पुढील गोष्टी निरसित होतील,—

(क) विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८) याची कलमे ६, ७, १८ व ३७ आणि त्या अधिनियमातील कलमे ८, ९, १६, १७, १९ आणि ४१ यांचा जेवढा भाग विधिव्यावसायिकांच्या प्रवेशासंबंधात आणि नावनोंदणी संबंधात लागू असेल तेवढा भाग ;

(ख) मुंबई प्लीडर्स अधिनियम, १९२० (१९२० चा मुंबई अधिनियम १७) याची कलमे ३, ४ आणि ६ ;

(ग) भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) याच्या कलम ८ मधील जेवढा भाग विधिव्यावसायिकांच्या प्रवेशासंबंधात आणि नावनोंदणी संबंधात लागू असेल तेवढा भाग ;

(घ) कोणत्याही उच्च न्यायालयाची एकस्वपत्रे आणि इतर कोणताही कायदा यांच्या तरतुदी जेथपर्यंत विधिव्यावसायिकांच्या प्रवेश आणि नावनोंदणीच्या संबंधात लागू असतील तेथपर्यंत त्या तरतुदी.

(३) प्रकरण चार अंमलात येण्याच्या दिनांकास, पुढील गोष्टी निरसित होतील :—

(क) विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८) याची कलमे ४, ५, १० आणि २० आणि त्या अधिनियमातील कलमे ८, ९, १९ आणि ४१ याचा जेवढा भाग विधिव्यावसायिकांस कोणत्याही न्यायालयात अथवा प्राधिकरणासमोर अथवा व्यक्तीसमोर विधिव्यवसाय करण्याबाबत हक्क प्रदान करीत असेल तेवढा भाग ;

(ख) मुंबई प्लीडर्स अधिनियम, १९२० (१९२० चा मुंबई अधिनियम १७) याची कलमे ५, ७, ८ आणि ९ ;

(ग) भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) याचे कलम १४ आणि त्या अधिनियमातील कलमे ८ व १५ यामधील जेवढा भाग विधिव्यावसायिकांना कोणत्याही न्यायालयासमोर अथवा कोणत्याही प्राधिकरणासमोर अथवा व्यक्तीसमोर विधिव्यवसाय करण्यास हक्क प्रदान करीत असेल तेवढा भाग ;

(घ) सर्वोच्च न्यायालय अधिवक्ते (उच्च न्यायालयातील व्यवसाय) अधिनियम, १९५१ (१९५१ चा १८) ;

(ङ) विधिव्यावसायिकांस कोणत्याही न्यायालयात अथवा कोणत्याही प्राधिकरणासमोर अथवा व्यक्तीसमोर विधिव्यवसाय करण्यासंबंधीचा हक्क प्रदान करणाऱ्या उच्च न्यायालयाच्या एकस्वपत्राच्या अथवा इतर कायद्याच्या तरतुदी.

(४) प्रकरण पाच अंमलात येण्याच्या दिनांकास पुढील गोष्टी निरसित होतील :—

(क) विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८) याची कलमे १२ ते १५ (दोन्ही धरून), कलमे २१ ते २४ (दोन्ही धरून) आणि कलमे ३९ व ४० आणि त्या अधिनियमातील कलमे १६, १७ आणि ४१ यांमधील जेवढा भाग विधिव्यावसायिकांचे निलंबन, काढून टाकणे अथवा बडतर्फी यासंबंधी असेल तेवढा भाग ;

(ख) मुंबई प्लीडर्स अधिनियम, १९२० (१९२० चा मुंबई अधिनियम १७) याची कलमे २४ ते २७ (दोन्ही धरून) ;

(ग) भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) याची कलमे १० ते १३ (दोन्ही धरून) ;

(घ) कोणत्याही उच्च न्यायालयाच्या एकस्वपत्राचे आणि इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदी जेथवर विधिव्यावसायिकांचे निलंबन अथवा बडतर्फी या संबंधात असतील तेथवर त्या तरतुदी.

(५) जेव्हा हा अधिनियम पूर्णपणे अंमलात येईल तेव्हा :—

(क) या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींमुळे या कलमात उल्लेखलेल्या या अधिनियमाच्या ज्या उर्वरित तरतुदी निरसित होत नसतील त्या [विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८) याच्या कलम १, ३, व ३६ या कलमांव्यतिरिक्तच्या] तरतुदी निरसित होतील ;

(ख) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमिती त्यात उल्लेखिलेल्या मर्यादेपर्यंत निरसित होतील.

**५१.** नियत दिवशी व त्यापासून कोणत्याही अधिनियमितीमध्ये उच्च न्यायालयाने नावनोंदणी केलेल्या अधिवक्त्याबाबतचा कोणत्याही शब्दातील उल्लेख हा या अधिनियमाखाली नावनोंदणी झालेल्या अधिवक्त्याचा उल्लेख असल्याप्रमाणे त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल. **अन्वयार्थाचा नियम.**

**५२.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे संविधानाच्या १४५ व्या अनुच्छेदानुसार पुढील बाबींकरिता नियम करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारास बाध येते असे समजण्यात येणार नाही :— **व्यावृत्ती.**

(क) वरिष्ठ अधिवक्त्यास त्या न्यायालयात विधिव्यवसाय करण्याकरिता ज्या शर्तींच्या अधीन हक्क असतील, त्या शर्ती ठरवणे ;

(ख) त्या न्यायालयात [1][काम करण्याचा किंवा म्हणणे मांडण्याचा] हक्क ज्यांना असेल अशा व्यक्ती निश्चित करणे.

## प्रकरण सात

## अस्थायी आणि संक्रमणात्मक तरतुदी

**पहिल्या राज्य वकील परिषदेकरिता निवडणुका.**

**५३.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमानुसार प्रथमच स्थापन केलेल्या राज्य वकील परिषदेच्या निर्वाचित सदस्यांची निवड, जे अधिवक्ते, वकील, प्लीडर आणि न्यायप्रतिनिधी निवडणुकीच्या दिवशी उच्च न्यायालयात विधिव्यवसाय करण्याच्या अधिकाराचे हक्कदार असतील आणि ज्या प्रदेशाकरिता वकील परिषद स्थापन करण्यात आली असेल त्यात साधारणः विधिव्यवसाय करीत असतील त्यांच्याद्वारे आणि त्यांच्यामधून करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**ज्या क्षेत्रासाठी वकील परिषद घटित करावयाची असेल त्या क्षेत्रामध्ये जेव्हा संघ राज्यक्षेत्राचा अंतर्भाव होत असेल तेव्हा, " उच्च न्यायालय " या शब्दप्रयोगात, त्या संघ राज्यक्षेत्राच्या न्यायिक आयुक्ताच्या न्यायालयाचा समावेश होतो.

**पहिल्या राज्य वकील परिषदेच्या सदस्यांचा पदावधी.**

**५४.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, पहिल्या वेळी घटित करण्यात आलेल्या [2]* * * राज्य वकील परिषदेच्या [3]* * * निर्वाचित सदस्यांचा पदावधी, त्या परिषदेच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून दोन वर्षे इतका असेल :

[4][परंतु, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार राज्य वकील परिषद पुनर्घटित होईपर्यंत असे सदस्य पद धारण करणे चालू ठेवतील.]

**विवक्षित विद्यमान विधिव्यवसायींच्या हक्कांना बाधा न येणे.**

**५५.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी,—

(क) प्रकरण चार अंमलात येण्याच्या लगत दिनांकापूर्वी (या कलमात यापुढे ज्याचा " उच्च दिनांक " असा निर्देश करण्यात आला आहे) विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८), मुंबई प्लीडर्स अधिनियम, १९२० (१९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक १७) यांच्या किंवा इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या आधारे प्लीडर किंवा वकील म्हणून विधिव्यवसाय करणारा जो वकील अथवा प्लीडर या अधिनियमान्वये अधिवक्ता म्हणून नोंदणी करून घेणे पसंत करीत नसेल किंवा तशी नोंदणी होण्यास अर्ह नसेल असा प्रत्येक वकील किंवा प्लीडर ;

(ख) [5]* * * * *

[6][(ग) विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८) याच्या किंवा अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या आधारे, उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी मुखत्यार म्हणून विधिव्यवसाय करणारी जी व्यक्ती या अधिनियमान्वये अधिवक्ता म्हणून नोंदणी करून घेणे पसंत करीत नसेल किंवा तशी नोंदणी होण्यास अर्ह नसेल, असा प्रत्येक मुखत्यार ;

(घ) विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८), याच्या किंवा इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या आधारे महसूल अभिकर्ता म्हणून विधिव्यवसाय करणारा प्रत्येक अभिकर्ता ;]

हा, विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८), मुंबई प्लीडर्स अधिनियम, १९२० (१९२० चा मुंबई अधिनियम १७) किंवा अन्य कोणताही कायदा, यातील संबंधित तरतुदींचे या अधिनियमान्वये निरसन झाले असले तरीही, कोणत्याही न्यायालयातील किंवा महसूल कार्यालयातील किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोरील किंवा व्यक्तीसमोरील व्यवसायाच्या संबंधात त्याच अधिकाराचा वापर करणे चालू ठेवील आणि त्याच प्राधिकरणाच्या शिस्तविषयक अधिकारितेच्या अधीन राहील, जे त्याला उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी वापरता येत होते, किंवा, यथास्थिति, ज्याच्या तो अधीन होता आणि तद्नुसार उपरोक्त अधिनियमांच्या किंवा कायद्याच्या संबंधित तरतुदी ह्या जणू काही निरसित झाल्या नव्हत्या अशा रीतीने अशा व्यक्तींच्या बाबतीत अंमलात राहतील.

---

[1] १९९३ चा अधिनियम ७०, कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (२६ डिसेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून).

[2] १९६२ चा अधिनियम १४, कलम ३ अन्वये " नामनिर्देशित व " हे शब्द वगळण्यात आले.

[3] १९६४ चा अधिनियम २१, कलम २२ अन्वये " भारतीय वकील परिषदेच्या आणि " हे शब्द (भूतलक्षी प्रभावाने) वगळण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २२ अन्वये (भूतलक्षी प्रभावाने) समाविष्ट केले.

[5] १९७६ चा अधिनियम १०७, कलम १० द्वारे खंड (ख) वगळण्यात आला.

[6] १९६४ चा अधिनियम २१, कलम २३ द्वारे मूळ खंड (ग) ऐवजी दाखल करण्यात आला.

**५६.** (१) दिल्लीच्या वकील परिषदेव्यतिरिक्त अन्य राज्य वकील परिषद (यात यापुढे ज्याचा उल्लेख नवीन वकील परिषद असा करण्यात आला आहे) या अधिनियमान्वये घटित झाल्यावर,— **विद्यमान वकील परिषदेचे विसर्जन.**

(क) तत्सम वकील परिषदेकडे विहित असलेली सर्व मालमत्ता व मत्ता नवीन वकील परिषदेकडे निहित होईल ;

(ख) तत्सम वकील परिषदेचे सर्व अधिकार, दायित्वे व आबंधने ही— मग ती एखाद्या संविदेतून उद्‌भवलेली असोत किंवा अन्यथा उद्‌भवलेली असोत—नवीन वकील परिषदेची अनुक्रमे अधिकार, दायित्वे व आबंधने होतील ;

(ग) तत्सम वकील परिषदेसमोर कोणत्याही शिस्तविषयक बाबी संबंधातील किंवा अन्य प्रकारची प्रलंबित असलेली सर्व कार्यवाही ही, नवीन वकील परिषदेकडे हस्तांतरित होईल.

(२) या कलमात, " तत्सम वकील परिषद " याचा, दिल्लीच्या वकील परिषदेव्यतिरिक्त अन्य राज्य वकील परिषदेच्या संबंधातील अर्थ, ज्या क्षेत्रासाठी या अधिनियमान्वये राज्य वकील परिषद घटित करण्यात आली असेल, त्या क्षेत्रातील उच्च न्यायालयाची वकील परिषद असा आहे.

**५७.** या अधिनियमान्वये वकील परिषद घटित होईपर्यंत, त्या वकील परिषदेच्या, या अधिनियमाखालील नियम करण्याच्या अधिकाराचा वापर पुढीलप्रमाणे केला जाईल :— **वकील परिषद घटित होईपर्यंत नियम करण्याचा अधिकार.**

(क) भारतीय वकील परिषदेच्या बाबतीत, सर्वोच्च न्यायालयाकडून ;

(ख) राज्य वकील परिषदेच्या बाबतीत, उच्च न्यायालयाकडून.

[१][**५८.** (१) जेव्हा या अधिनियमान्वये राज्य वकील परिषद घटित करण्यात आलेली नसेल किंवा अशा रीतीने घटित करण्यात आलेल्या राज्य वकील परिषदेला एखाद्या न्यायालयाच्या आदेशामुळे किंवा अन्य कारणामुळे आपली कर्तव्य पार पाडणे शक्य नसेल, तेव्हा या वकील परिषदेची किंवा तिच्या कोणत्याही समितीची कामे जेथवर ती अधिवक्त्यांना प्रवेश देणे व त्यांची नोंदणी करणे याच्याशी संबंधित असतील तेथवर, उच्च न्यायालयाकडून, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार पार पाडली जातील. **संक्रमण काळातील विशेष तरतुदी.**

(२) प्रकरण चार अंमलात येईपर्यंत, राज्य वकील परिषद किंवा राज्य वकील परिषदेची कामे पार पाडणारे उच्च न्यायालय हे, कलम २८ अन्वये कोणतेही नियम करण्यात आलेले नसले किंवा असे करण्यात आलेले नियम भारतीय वकील परिषदेकडून मान्य झालेले नसले तरीही, एखाद्या व्यक्तीची, जर ती या अधिनियमान्वये अधिवक्ता म्हणून नोंदणी होण्यास अर्ह असेल तर, राज्याच्या नामावलीत तिची तशी नोंदणी करू शकेल, आणि अशा रीतीने नोंदणी झालेल्या प्रत्येक व्यक्तीला, हे प्रकरण अंमलात येईपर्यंत, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) याच्या कलम १४ अन्वये अधिवक्त्याला प्रदान करण्यात आलेले व्यवसाय करण्याचे सर्व अधिकार मिळण्याचा हक्क असेल.

(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, जी व्यक्ती, १ डिसेंबर, १९६१ पूर्वी, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) खालील कोणत्याही उच्च न्यायालयाच्या पटावरील अधिवक्ता होती किंवा जिची या अधिनियमान्वये अधिवक्ता म्हणून नोंदणी झालेली आहे, तिला प्रकरण चार अंमलात येईपर्यंत, सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात केलेल्या नियमांच्या अधीनतेने या सर्वोच्च न्यायालयात व्यवसाय करण्याचा अधिकार राहील.

(४) कलम ५०, पोटकलम (२) अन्वये विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८) याच्या तरतुदींचे किंवा मुंबई प्लीडर्स अधिनियम, १९२० (१९२० चा मुंबई अधिनियम १७) याच्या तरतुदींचे, [२][किंवा विधिव्यवसायींना प्रवेश व नोंदणी यासंबंधातील अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींचे निरसन झाले असले तरी, उपरोक्त अधिनियमांचे व कायद्याच्या तरतुदी] आणि त्याखाली करण्यात आलेले नियम हे, जेथवर ते, विधिव्यवसायीस व्यवसाय करण्यास प्राधिकृत करण्याऱ्या प्रमाणपत्राच्या [३][नवीकरणाशी किंवा नवीकरणाद्वारे प्रमाणपत्र मंजूर करण्याशी] संबंधित असतील तेथवर, प्रकरण चार अंमलात येईपर्यंत परिणामक असतील आणि त्यानुसार, (जो या अधिनियमान्वये अधिवक्ता म्हणून नोंदलेला नाही अशा) विधिव्यवसायीला देण्यात आलेले किंवा नवीकरण करून देण्यात आलेले जे प्रमाणपत्र, १ डिसेंबर, १९६१ पासून सुरू होणाऱ्या व हे प्रकरण चार अंमलात येण्याच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीत, उपरोक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाच्या [४][किंवा अन्य कायद्याच्या] तरतुदींन्वये देण्यात आलेले किंवा नवीकरण करण्यात आलेले असेल किंवा तसे अभिप्रेत असेल, ते प्रमाणपत्र विधिग्राह्य रीतीने दिलेले किंवा नवीकरण केलेले आहे, असे मानण्यात येईल.

---

[१] १९६२ चा अधिनियम १४, कलम ४ द्वारे कलमे ५८ व ५९ ही (भूतलक्षी प्रभावाने) समाविष्ट केली.

[२] १९६२ चा अधिनियम ३२, कलम ३ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (भूतलक्षी प्रभावाने).

[३] १९६४ चा अधिनियम २१, कलम २४ द्वारे " मंजूर करण्याशी किंवा नवीकरणाशी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] १९६२ चा अधिनियम ३२, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (भूतलक्षी प्रभावाने).

**विवक्षित अधिवक्त्यांच्या संबंधात विशेष तरतुदी.**

[1][**५८क.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जे अधिवक्ते २६ जुलै, १९४८ च्या निकटपूर्वी अलाहाबाद उच्च न्यायालयात किंवा औंध येथील मुख्य न्यायालयात विधिव्यवसाय करण्यास हक्कदार होते आणि ज्यांना, संयुक्त प्रांत उच्च न्यायालये (एकत्रीकरण) आदेश, १९४८ च्या तरतुदींन्वये, अलाहाबाद येथील नवीन उच्च न्यायालयात विधिव्यवसाय करण्यास हक्कदार अधिवक्ते म्हणून मान्यता मिळाली होती परंतु, उक्त उच्च न्यायालयाच्या वकील परिषदेला देय असलेली फी भरलेली नाही, याच केवळ कारणावरून ज्यांची नावे त्या उच्च न्यायालयाच्या अधिवक्त्यांच्या नामावलीत पूर्वी समाविष्ट करण्यात आलेली नव्हती, असे सर्व अधिवक्ते, आणि उक्त दिनांक आणि २६ मे, १९५२ या दरम्यान, अधिवक्ता म्हणून नोंदणी झालेले सर्व अधिवक्ते हे, कलम १७, पोटकलम (१), खंड (क) च्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये उक्त उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ते म्हणून नोंदणी झालेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल आणि अशा प्रत्येक व्यक्तीस, त्या संदर्भात अर्ज करण्यात आल्यावर, उत्तर प्रदेशाच्या राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जे अधिवक्ते, १० ऑक्टोबर, १९५२ च्या निकटपूर्वी हैद्राबाद उच्च न्यायालयात विधिव्यवसाय करण्यास हक्कदार होते, परंतु ज्यांची नावे, उच्च न्यायालयाच्या वकील परिषदेला देय असलेली फी भरलेली नाही, याच केवळ कारणावरून, त्या उच्च न्यायालयाच्या अधिवक्त्यांच्या नामावलीत पूर्वी समाविष्ट करण्यात आली नव्हती, असे सर्व अधिवक्ते हे, कलम १७, पोटकलम (१) खंड (क) च्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये, उक्त उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ते म्हणून नोंदणी झालेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा प्रत्येक व्यक्तीस, त्यासंदर्भात अर्ज करण्यात आल्यावर, आंध्र प्रदेश राज्यांच्या किंवा महाराष्ट्र राज्याच्या नामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल.

(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, १ मे, १९६० च्या निकटपूर्वी जे अधिवक्ते मुंबई उच्च न्यायालयात व्यवसाय करण्यास पात्र होते आणि ज्यांनी, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८), कलम ८ च्या तरतुदींन्वये, गुजराथ उच्च न्यायालयाच्या अधिवक्त्यांच्या पटावर आपली नावे नोंदवण्यासाठी अर्ज केलेला होता परंतु, उक्त तरतूद निरसित झाल्याकारणाने ज्यांची नावे नोंदण्यात आलेली नव्हती, ते सर्व अधिवक्ते, कलम १७, पोटकलम (१), खंड (क) च्या प्रयोजनार्थ, उक्त अधिनियमान्वये गुजराथ उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ते म्हणून नोंदणी झालेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा प्रत्येक व्यक्तीस, त्यासंदर्भात अर्ज करण्यात आल्यावर, गुजराथ राज्याच्या नामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल.

(४) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, १ डिसेंबर, १९६१ च्या निकटपूर्वी ज्या व्यक्ती एखाद्या संघ राज्यक्षेत्रात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये त्या क्षेत्राच्या न्यायिक आयुक्ताच्या न्यायालयाच्या पटावर अधिवक्ते म्हणून असतील त्या व्यक्तींना, कलम १७, पोटकलम (१), खंड (क) च्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ते म्हणून नोंदणी झालेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा प्रत्येक व्यक्तीस, त्यासंदर्भात अर्ज करण्यात आल्यावर, त्या संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात ठेवण्यात आलेल्या राज्य नामावलीमध्ये अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल.

**[2][पाँडेचरीच्या संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील विशेष तरतुदी.**

**५८कक.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, प्रकरण तीन च्या तरतुदी पाँडेचरीच्या संघ राज्यक्षेत्रात ज्या दिनांकास अंमलात आणल्या असतील, त्या दिनांकाच्या निकटपूर्वी ज्या व्यक्ती, उक्त संघराज्य क्षेत्रात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विधिविषयक कोणताही व्यवसाय (मग तो म्हणणे मांडण्याचा असो वा कृती करण्याचा असो किंवा दोन्हीचा असो) करण्यास हक्कदार होत्या किंवा ज्या व्यक्ती उक्त दिनांकास लोकसेवेत नसत्या तर हक्कदार ठरल्या असत्या, त्या व्यक्तींना, कलम १७, पोटकलम (१), खंड (क) च्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ते म्हणून नोंदणी झालेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा प्रत्येक व्यक्तीस, मद्रास वकील परिषदेने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, त्यासंदर्भात अर्ज करण्यात आल्यावर, उक्त संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात ठेवलेल्या राज्यनामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, पाँडेचरीच्या संघ राज्यक्षेत्रात प्रकरण चार च्या तरतुदी ज्या दिनांकास अंमलात आणल्या त्या दिनांकाच्या निकटपूर्वी जी व्यक्ती उक्त संघराज्य क्षेत्रात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार, कायदेविषयक व्यवसाय (मग तो म्हणणे मांडण्याचा असो किंवा कृती करण्याचा असो किंवा दोन्हीचा असो किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा असो) करीत असेल व जी पोटकलम (१) अनुसार अधिवक्ता म्हणून नोदणी करणे पसंत करीत नसेल, किंवा नोंदणी करण्यास अर्ह

---

[1] १९६४ चा अधिनियम २१, कलम २५ द्वारे कलमे ५८क व ५८ख समाविष्ट करण्यात आली.

[2] १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूची याद्वारे समाविष्ट करण्यात आले.

ठरत नसेल, अशी प्रत्येक व्यक्ती, अशा कायद्यातील संबंधित तरतुदींचे पाँडेचरी (कायद्याचा विस्तार) अधिनियम, १९६८ (१९६८ चा २६) अन्वये निरसन झालेले असले तरी, कोणत्याही न्यायालयातील किंवा महसूल कार्यालयातील किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोरील किंवा व्यक्ती व्यवसायासंबंधात त्याच अधिकाराचा वापर करणे चालू ठेवील आणि त्याच प्राधिकरणाच्या शिस्तविषयक अधिकारितेच्या अधीन राहील, जे तिला उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी वापरता येत होते, किंवा यथास्थिति, ज्याच्या ती अधीन होती आणि तद्नुसार, उपरोक्त कायद्याच्या संबंधित तरतुदी ह्या जणू काही निरसित झालेल्या नव्हत्या अशा रीतीने अशा व्यक्तीच्या संबंधात अंमलात राहतील.]

**म्हैसूर राज्य वकील परिषदेने नोंदणी केलेल्या विवक्षित व्यक्तींच्या संबंधात विशेष तरतुदी.**

[1][**५८कख.** या अधिनियमात किंवा एखाद्या न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेश किंवा भारतीय वकील परिषदेने संमत केलेल्या एखाद्या ठरावात किंवा दिलेल्या निदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, २८ फेब्रुवारी १९३३ रोजी सुरू होणाऱ्या व ३१ मार्च १९६४ रोजी संपणाऱ्या कालावधीत, म्हैसूर राज्य वकील परिषदेने ज्या व्यक्तींना म्हैसूर उच्च न्यायालयाकडून त्यांनी वकिलीचे प्रमाणपत्र मिळविलेले आहे या आधारे, राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेतलेले असेल अशी प्रत्येक व्यक्ती ही, अन्यथा तरतूद करण्यात आले असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, राज्य सूचीत अधिवक्ता म्हणून वैधरीत्या दाखल करून घेण्यात आल्याचे मानण्यात येईल, आणि तद्नुसार, त्या व्यक्ती विधिविषयक व्यवसाय करण्यास (मग तो म्हणणे मांडण्याचा असो वा कृती करण्याचा असो किंवा दोन्हीचा असो) हक्कदार राहील :

परंतु, अशा एखाद्या व्यक्तीने अन्य राज्याच्या वकील परिषदेच्या सूचीत अधिवक्ता म्हणून नाव दाखल करणे पसंत केले तर, ज्या दिनांकापासून तिला अन्य राज्याच्या वकील परिषदेत दाखल करून घेण्यात येईल, त्या दिनांकापासून तिचे नाव म्हैसूर राज्य वकील परिषदेच्या पटावरून काढून टाकण्यात आल्याचे मानण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, अशा व्यक्तीची वरिष्ठता ही, त्या व्यक्तीचे नाव म्हैसूर राज्य वकील परिषदेच्या राज्य नामावलीत असो अथवा अन्य एखाद्या वकील परिषदेच्या राज्य नामावलीत असो, कलम १७, पोटकलम (३), खंड (घ) याच्या प्रयोजनार्थ, १६ मे १९६४ हा दिनांक दाखल झाल्याचा दिनांक मानून गणली जाईल.]

**उत्तर प्रदेश वकील परिषदेने नोंदणी केलेल्या विवक्षित व्यक्तींच्या संबंधात विशेष तरतुदी.**

[2][**५८कग.** या अधिनियमात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, २ जानेवारी १९६२ पासून सुरू होणाऱ्या व २५ मे १९६२ रोजी संपणाऱ्या कालावधीत, ज्या व्यक्तीचा उच्च न्यायालयाने अधिवक्ता म्हणून नोंदणी केलेली होती आणि नंतर जिला उत्तरप्रदेश वकील परिषदेने अधिवक्ता म्हणून राज्य नामावलीत दाखल करून घेतले होते अशी प्रत्येक व्यक्ती ही, उच्च न्यायालयाने तिची नोंदणी करण्याच्या दिनांकापासून, त्या राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून वैधरीत्या दाखल करून घेतलेली व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार ती व्यक्ती कायदेविषयक विधिव्यवसाय करण्यास (मग तो म्हणणे मांडण्याचा असो वा कृती करण्याचा असो किंवा दोन्हीचा असो) हक्कदार असेल.

**भारतामध्ये स्थलांतर करून येणाऱ्या विवक्षित व्यक्तींसाठी विशेष तरतुदी.**

**५८कघ.** विधिव्यवसायी अधिनियम, १८७९ (१८७९ चा १८) याच्या तरतुदी किंवा विधिव्यवसायींना दाखल करून घेणे व त्यांची नोंदणी करणे, यासंबंधातील अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदी (या कलमात यापुढे ज्यांचा उल्लेख असा अधिनियम किंवा कायदा असा करण्यात आला आहे) याचे, या अधिनियमान्वये निरसन झालेले असले तरीही, १५ ऑगस्ट, १९४७ पूर्वी जे क्षेत्र भारत सरकार अधिनियम, १९३५ अन्वये व्याख्या केलेल्या भारताचाच एक भाग होते, अशा क्षेत्रांमधून भारताच्या क्षेत्रात स्थलांतर करणाऱ्या आणि अशा स्थलांतरापूर्वी जी अशा क्षेत्रात, त्या क्षेत्रातील अंमलात असलेल्या कायद्यान्वये प्लीडर, मुखत्यार किंवा महसूल अभिकर्ता होतो अशा प्रत्येक व्यक्तीस, अशा अधिनियमाच्या किंवा कायद्याच्या संबंधित तरतुदींन्वये, पुढील प्रकरणी प्लीडर म्हणून, मुखत्यार म्हणून किंवा, यथास्थिति, महसूल अभिकर्ता म्हणून दाखल करून घेता येईल व नोंदणी करता येईल :—

(क) जर तिने अशा अधिनियमाखालील किंवा कायद्याखालील समुचित प्राधिकरणाकडे त्या प्रयोजनार्थ अर्ज केलेला असेल ; आणि

(ख) जर ती भारताची नागरिक असेल आणि उपरोक्त समुचित प्राधिकरणाने त्या संदर्भात काही अन्य शर्ती विनिर्दिष्ट केलेल्या असल्यास त्या शर्तींचे अनुपालन करीत असेल,

आणि अशा अधिनियमाच्या किंवा कायद्याच्या संबंधित तरतुदींचे या अधिनियमान्वये निरसन झाले असले तरीही, अशा रीतीने नोंदणी करण्यात आलेल्या प्रत्येक प्लीडरला, मुखत्याराला किंवा महसूल अभिकर्त्याला, कोणत्याही न्यायालयातील किंवा महसूल कार्यालयातील किंवा अन्य प्राधिकरणासमोरील किंवा व्यक्तीसमोरील व्यवसायाच्या संबंधात तेच अधिकार असतील आणि त्याच प्राधिकरणाच्या शिस्तविषयक अधिकारितेच्या तो अधीन राहील, जे त्याला, अशा अधिनियमाच्या किंवा कायद्याच्या संबंधित तरतुदी निरसित झाल्या नसत्या तर, वापरता आल्या असत्या आणि ज्याच्या तो अधीन राहिला असता आणि तद्नुसार त्या तरतुदी अशा व्यक्तींच्या संबंधात अंमलात राहतील.

[1] १९६८ चा अधिनियम ३३, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (५ जून, १९६८ रोजी व तेव्हापासून).

[2] १९७३ चा अधिनियम ६०, कलम ४० द्वारे समाविष्ट केले (३१ जानेवारी, १९७४ रोजी व तेव्हापासून).

गोवा, दमण व दीव या संघ राज्यक्षेत्रा-संबंधात विशेष तरतुदी.

**५८कङ.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रकरण तीनच्या तरतुदी गोवा, दमण व दीव या संघ राज्यक्षेत्रात ज्या दिनांकास अंमलात आणण्यात आल्या, त्या दिनांकाच्या निकटपूर्वी, ज्या व्यक्ती, त्या उक्त संघराज्य क्षेत्रात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, विधिव्यवसाय (मग तो म्हणणे मांडण्याचा असो किंवा कृती करण्याचा असो किंवा दोन्हीचा असो) करण्यास हक्कदार होत्या किंवा ज्या व्यक्ती उक्त दिनांकास लोकसेवेत नसत्या तर त्या तशा हक्कदार ठरल्या असत्या, अशा सर्व व्यक्ती ह्या, कलम १७, पोटकलम (१), खंड (क) च्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये, उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ता म्हणून नोंदणी झालेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा प्रत्येक व्यक्तीस, महाराष्ट्र वकील परिषदेने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत तशा अर्थाचा अर्ज करण्यात आल्यावर, उक्त संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात ठेवलेल्या राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल :

परंतु, उपरोक्त अर्जाच्या दिनांकास भारताची नागरिक असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या पोटकलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रकरण चारच्या तरतुदी गोवा, दमण व दीव या संघराज्यक्षेत्रात अंमलात आल्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी जी व्यक्ती उक्त संघ राज्यक्षेत्रात अंमलात आलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या आधारे, विधिव्यवसाय (मग तो म्हणणे मांडण्याचा असो किंवा कृती करण्याचा असो किंवा दोन्हीचा असो) करण्यास हक्कदार होती, किंवा जिने पोटकलम (१) अनुसार अधिवक्ता म्हणून नोंदणी करणे पसंत केले नव्हते किंवा जी (तशी नोंदणी होण्यास) अर्ह नव्हती, अशी प्रत्येक व्यक्ती, अशा कायद्याच्या संबंधित तरतुदींचे या अधिनियमान्वये निरसन झाले असेल तरीही, एखाद्या न्यायालयातील किंवा महसूल कार्यालयातील किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोरील किंवा व्यक्तीसमोरील व्यवसायाच्या संबंधात तेच अधिकार वापरणे चालू ठेवील आणि त्याच प्राधिकरणाच्या शिस्तविषयक अधिकारितेच्या अधीन राहील, जे तिला उक्त दिनांकाच्या निकटपूर्वी वापरता येत होते, किंवा, यथास्थिति, त्याच्या ती अधीन होती आणि उपरोक्त कायद्याच्या संबंधित तरतुदी अशा व्यक्तीच्या संबंधात, जणू काही त्या निरसित झाले नव्हते अशा रीतीने लागू होतील.

(३) ज्या दिनांकास हा अधिनियम किंवा त्याचा काही भाग, गोवा, दमण व दीव या संघ राज्यक्षेत्रात अंमलात येईल त्याच दिनांकास, त्या संघराज्य क्षेत्रात अंमलात असलेला, या अधिनियमाची किंवा त्याच्या अशा भागाशी तत्सम असा आणि जो या अधिनियमाच्या कलम ५० च्या आधारे निरसित झालेला नाही, असा कायदाही निरसित होईल.

जम्मू व काश्मीरच्या संबंधात विशेष तरतुदी.

**५८कच.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, प्रकरण तीनच्या तरतुदी जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात आल्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी जे त्या राज्याच्या उच्च न्यायालयात व्यवसाय करण्यास हक्कदार होते किंवा उक्त दिनांकास जे लोकसेवेत नसते तर जे असे हक्कदार ठरले असते असे सर्व अधिवक्ते हे, कलम १७, पोटकलम (१) च्या खंड (क) च्या प्रयोजनार्थ, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये उच्च न्यायालयाच्या पटावर अधिवक्ते म्हणून नोंदणी झालेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल. आणि अशा प्रत्येक व्यक्तीस, भारतीय वकील परिषदेने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत त्या संदर्भात अर्ज करण्यात आल्यावर, उक्त राज्याच्या संबंधात ठेवलेल्या राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रकरण तीनच्या तरतुदी जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात आल्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी जी व्यक्ती अधिवक्त्याव्यतिरिक्त अन्यथा, विधिव्यवसाय (मग तो म्हणणे मांडण्याचा असो किंवा कृती करण्याचा असो किंवा दोन्हीचा असो) करण्यास उक्त राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या आधारे हक्कदार होती, किंवा उक्त दिनांकास जी व्यक्ती लोकसेवेत नसती तर ती हक्कदार ठरली असती अशा प्रत्येक व्यक्तीला पुढील प्रकरणी, उक्त राज्याच्या संबंधात ठेवलेल्या राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल :—

(एक) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशी नोंदणी करण्यासाठी अर्ज करण्यात येईल तेव्हा ; आणि

(दोन) कलम, २४, पोटकलम (१) चे खंड (क), (ख), (ङ) आणि (च) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पूर्ण करण्यात येतील तेव्हा.

(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रकरण चारच्या तरतुदी जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात आल्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी जी व्यक्ती, त्या राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या आधारे विधिव्यवसाय (मग तो म्हणणे मांडण्याचा असो किंवा कृती करण्याचा असो किंवा दोन्हीचा असो) करीत होती, किंवा जिने, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये अधिवक्ता म्हणून नोंदणी करून घेणे पसंत केलेले नाही किंवा जी तशी नोंदणी करून घेण्यात अर्ह नाही, अशी प्रत्येक व्यक्ती, अशा कायद्याच्या संबंधित तरतुदींचे या अधिनियमान्वये निरसन झाले असले तरीही, कोणत्याही न्यायालयातील किंवा महसूल कार्यालयातील किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोरील किंवा व्यक्तीसमोरील व्यवसायाच्या संबंधात त्याच अधिकारांचा वापर करणे चालू ठेवील आणि त्याच प्राधिकरणाच्या शिस्तविषयक अधिकारितेच्या अधीन राहील, जे उक्त दिनांकाच्या निकटपूर्वी तिला वापरता येत होते किंवा, यथास्थिति, ज्याच्या ती अधीन होती, आणि तद्नुसार उपरोक्त कायद्याच्या संबंधित तरतुदी अशा व्यक्तीच्या संबंधात, जणू काही त्या निरसित झाल्या नव्हत्या अशा रीतीने अंमलात येतील.

(४) हा अधिनियम किंवा त्याचा कोणताही भाग जम्मू व काश्मीर राज्यात ज्या दिनांकास अंमलात येईल, त्या दिनांकास, त्या राज्यात अंमलात असलेल्या, या अधिनियमाशी किंवा त्याच्या भागाशी तत्सम असा जो कायदा, या अधिनियमाच्या कलम ५० च्या तरतुदींच्या परिणामी निरसित झालेला नसेल तो सुद्धा निरसित होईल.]

सॉलिसिटर होणाऱ्या शिक्षार्थींच्या संबंधात विशेष तरतुदी.

[१][**५८कछ.** या अधिनियमात काहीही अतर्भूत असले तरी, ३१ डिसेंबर १९७६ च्या निकटपूर्वी ज्या व्यक्तीने सॉलिसिटर होण्याकरिता शिक्षार्थी म्हणून काम करण्यास प्रारंभ केलेला असेल आणि कलम ३४, पोटकलम (२) हे, अधिवक्ता (विशोधन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा १०७) अन्वये वगळण्यात येण्यापूर्वी त्या पोटकलमान्वये केलेल्या नियमांना अनुसरून जी, कलकत्ता येथील उच्च न्यायलयाचा मुखत्यार म्हणून नोंदणी करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, प्रारंभिक परीक्षा उत्तीर्ण झाली आहे, अशा प्रत्येक व्यक्तीस पुढील प्रकरणी, राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून दाखल करून घेता येईल :—

(एक) ती पुढील परीक्षा ३१ डिसेंबर, १९८० रोजी किंवा तत्पूर्वी उत्तीर्ण झालेली असेल तर,—

(क) जेव्हा अशी व्यक्ती ३१ डिसेंबर, १९७६ पूर्वी माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेली असेल तेव्हा, अंतिम परीक्षा,

(ख) इतर कोणत्याही प्रकरणी माध्यमिक व अंतिम परीक्षा.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, कलकत्ता उच्च न्यायालय, कलम ३४, पोटकलम (२) अन्वये आवश्यक वाटतील असे नियम विहित करू शकेल व त्यात, परीक्षेचे स्वरूप व इतर तत्संबंधित बाबी विनिर्दिष्ट करण्यात येतील ;

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार तिने अशा नोंदणीसाठी अर्ज केलेला असेल तर ; आणि

(तीन) कलम २४, पोटकलम (१), खंड (क), (ख), (ङ) आणि (च) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती ती पूर्ण करीत असेल तर.]

विवक्षित शिस्तविषयक कार्यवाही संबंधातील विशेष तरतूद.

**५८ख.** (१) १ सप्टेंबर १९६३ पासून असल्याप्रमाणे, उच्च न्यायालयाच्या विद्यमान अधिवक्त्याच्या संबंधातील कोणत्याही शिस्तविषयक बाबीविषयीची प्रत्येक कार्यवाही ही, पोटकलम (२) च्या पहिल्या परंतुकात तरतुद केल्याप्रमाणे असेल ते खेरीजकरून एरव्ही, त्या उच्च न्यायालयाच्या संबंधातील राज्य वकील परिषदेकडून, जणू काही तो विद्यमान अधिवक्ता त्या परिषदेच्या पटावर अधिवक्ता म्हणून नोंदणी झालेला असल्याप्रमाणे, निकालात काढली जाईल.

(२) एखाद्या विद्यमान अधिवक्त्याच्या संबंधातील कोणत्याही शिस्तविषयक बाबीविषयीची एखादी कार्यवाही उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी कोणत्याही उच्च न्यायालयाकडे, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) याखाली प्रलंबित असेल तर, अशी कार्यवाही ही, जणू काही ती संबंधित वकील परिषदेकडे, कलम ५६, पोटकलम (१), खंड (ग) खाली प्रलंबित असलेली कार्यवाही असल्याप्रमाणे, त्या उच्च न्यायालयाच्या संबंधातील राज्य वकील परिषदेकडे हस्तांतरित होईल :

परंतु, अशा एखाद्या कार्यवाहीच्या संबंधात जेव्हा उच्च न्यायालयाला, भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) याच्या कलम ११ अन्वये घटित केलेल्या एखाद्या न्यायाधिकरणाचे निष्कर्ष मिळालेले असतील, तेव्हा, उच्च न्यायालय ते प्रकरण निकालात काढील आणि त्या प्रयोजनार्थ उच्च न्यायालयाने, उक्त अधिनियमाच्या कलम १२ अन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा, जणू काही ते कलम निरसित करण्यात आलेले नव्हते अशा रीतीने वापर करणे हे, विधिसंमत असेल :

परंतु, आणखी असे की, जेव्हा उच्च न्यायालयाने एखादे प्रकरण, उक्त अधिनियमाच्या कलम १२, पोटकलम (४) अन्वये आणखी चौकशी करण्याकरिता पुनर्निर्देशित केलेले असेल तेव्हा, ती कार्यवाही, जणू काही ती कलम ५६, पोटकलम (१), खंड (ग) अन्वये संबंधित वकील परिषदेकडे प्रलंबित असलेली कार्यवाही असल्याप्रमाणे त्या उच्च न्यायालयाच्या संबंधातील राज्य वकील परिषदेकडे हस्तांतरित होईल.

(३) या अधिनियमान्वये एखाद्या राज्य नामावलीत अधिवक्ता म्हणून नोंदणी केलेल्या एखाद्या प्लीडरच्या, वकिलाच्या, मुखत्याराच्या किंवा न्याय प्रतिनिधीच्या संबंधातील शिस्तविषयक बाबीसंबंधीची कोणतीही कार्यवाही उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी प्रलंबित असेल तर, अशी कार्यवाही ही, त्याची अधिवक्ता म्हणून ज्या राज्य वकील परिषदेच्या पटावर नोंदणी झालेली असेल त्या वकील परिषदेकडे हस्तांतरित होईल आणि जणू काही ती त्याच्याविरुद्ध त्या अधिनियमान्वये निर्माण झालेली कार्यवाही आहे, अशाप्रकारे ती कार्यवाही केली जाईल.

(४) या कलमात " विद्यमान अधिवक्ता " याचा अर्थ, ज्या व्यक्तीची, कोणत्याही उच्च न्यायालयाच्या पटावर भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ (१९२६ चा ३८) अन्वये अधिवक्ता म्हणून नोंदणी

---

[१] १९७७ चा अधिनियम ३८, कलम ७ द्वारे समाविष्ट केले (३१ ऑक्टोबर, १९७७ रोजी व तेव्हापासून).

झालेली असेल आणि शिस्तविषयक बाबीसंबंधात तिच्याविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यात आली असेल त्यावेळी जिची या अधिनियमान्वये एखाद्या राज्य नामावलीवर अधिवक्ता म्हणून नोंदणी झालेली नव्हती, अशी व्यक्ती, असा आहे.

(५) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, या कलमाच्या तरतुदी परिणामक होतील.]

अडचणी दूर करणे.

**५९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, विशेषतः या अधिनियमाद्वारे निरसित झालेल्या अधिनियमितींकडून या अधिनियमाच्या तरतुदींकडे संक्रमित होताना काही अडचणी उद्‌भवल्यास केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** आदेशाद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांशी विसंगत नसतील व अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा तरतुदी करू शकेल.

(२) पोटकलम (१) खालील आदेश हा, १ डिसेंबर, १९६१ च्या पूर्वीचा नसेल अशा दिनांकापासून त्याचा भूतलक्षी प्रभाव राहावा यासाठी देता येईल.

[1][केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.

**६०.** (१) या अधिनियमाखालील एखाद्या प्रकरणाच्या संबंधात राज्य वकील परिषदेकडून नियम करण्यात येऊन ते भारतीय वकील परिषदेकडून मान्य होईपर्यंत, अशा प्रकरणासंबंधात नियम करण्याचा अधिकार केंद्र सरकारकडून वापरण्याजोगा असेल.

(२) केंद्र सरकार, भारतीय वकील परिषदेशी सल्लामसलत केल्यावर **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही राज्य वकील परिषदेकरिता किंवा सर्वसाधारणतः सर्व राज्य वकील परिषदांकरिता पोटकलम (१) अन्वये नियम करू शकेल आणि अशा रीतीने केलेले नियम, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक होतील.

(३) एखाद्या प्रकरणाच्या बाबतीत जेव्हा केंद्र सरकारने एखाद्या राज्य वकील परिषदेकरिता या कलमाखाली कोणतेही नियम केलेले असतील, आणि त्याच प्रकरणाच्या बाबतीत त्या राज्य वकील परिषदेतही नियम केलेले असतील आणि भारतीय वकील परिषदेने त्यांना मान्यता दिलेली असेल, तेव्हा, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, अशा प्रकरणाच्या बाबतीत त्याने स्वतः केलेले नियम हे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकापासून त्या वकील परिषदेच्या संबंधात अंमलात असणे बंद होईल आणि अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर, केंद्र सरकारने केलेले नियम तद्नुसार उक्त दिनांकापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या बाबतीत असेल त्या व्यतिरिक्त, अंमलात राहणे बंद होईल.]

---

[1] १९६२ चा अधिनियम ३२, कलम ४ द्वारे समाविष्ट केले.

## अनुसूची

[कलम ५० (५) पहा]

**विवक्षित अधिनियमितींचे निरसन**

| अनुक्रमांक | संक्षिप्त नाव | निरसनाची व्याप्ती |
|---|---|---|
| १ | विधिव्यवसायी (महिला) अधिनियम, १९२३ (१९२३ चा २३). . | . . |
| २ | विधिव्यवसायी (फी) अधिनियम, १९२६ (१९२६ चा २१) | . . संपूर्ण |
| ३ | राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ (१९५६ चा ३७) . . | . . कलम ५३ |
| ४ | मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० (१९६० चा १२) . . | . . कलम ३१ |

# THE ADVOCATE ACT, 1961

## अधिवक्ता अधिनियम, १९६१

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| ability | योग्यता | [Sec. 16(*2*)] |
| academic year | विद्यावर्ष | [Sec. 24(*1*) (*c*) (*iii a*)] |
| accountant | लेखापाल | [Sec. 11] |
| accounts | लेखे | [Sec. 11(*2*)] |
| acting | कार्यार्थ | [Sec. 24(*3*)(*aa*)] |
| adversary | प्रतिपक्ष | [Sec. 34(*1a*)] |
| advocate | अधिवक्ता | [Sec. 2(*1*)(*a*)] |
| Advocate General | महाअधिवक्ता | [Sec. 3(*2*)(*a*)] |
| aforesaid | पूर्वोक्त | [Sec. 6(*i*)] |
| agree to | मतैक्य होणे | [Sec. 49A(*5*)] |
| aid | सहाय्य | [Sec. 6(*2*)(*b*)] |
| appointed day | नियत दिवस | [Sec. 2(*1*)(*b*)] |
| appropriate authority | समुचित प्राधिकरण | [Sec. 58*AD*(*a*)] |
| appropriate fund | समुचित निधी | [Sec. 6(*3*)] |
| as the case may be | यथास्थिति | [Sec. 4(*2a*)] |
| attorney | मुखत्यार | [Sec. 24(*1*)(*c*)(*ii*)] |
| Attorney-General | महान्यायवादी | [Sec. 4(*1*)(*a*)] |
| audit | 1. लेखापरीक्षण | [Sec. 12(*2*)] |
| | 2. लेखापरीक्षा | [Sec. 12] |
| authenticated copy | अधिप्रमाणित प्रत | [Sec. 19] |
| bachelor's degree | स्नातक पदवी | [Sec. 2(*1*)(*h*)] |
| Bar Council | वकील परिषद | [Sec. 2(*1*)(*d*)] |
| benefaction | धर्मदान | [Sec. 6(*3*)] |
| body corporate | निगम निकाय | [Sec. 5] |
| bona fide | प्रामाणिकपणे | [Sec. 18] |
| cases of misconduct | गैरवर्तनाचे खटले | [Sec. 6)(*c*)] |
| casual vacancy | नैमित्तिक रिक्तपद | [Sec. 15(*2*) (*f*)] |
| chargeable | आकारण्याजोगी | [Sec. 24(*1*)(*f*)] |
| charge of the office | पदभार | [Sec.4(*2a*) (*Pro.*)] |
| common seal | सामाईक मुद्रा | [Sec. 5] |
| conditions of service | सेवाशर्ती | [Sec. 15(*2*)(*k*) |
| constituted | घटित | [Sec. 2 (*1*)(*g*)(*I*)] |
| cousultation | सल्लामसलत करणे | [Sec. 7(*h*)] |
| convicted | सिद्धदोष | [Sec. 24A (*1*)(*a*)] |
| cost of proceeding | वादखर्च | [Sec. 43] |
| course | पाठ्यक्रम | [Sec. 49A (*2*) (*d*)] |

| | | |
|---|---|---|
| decree | हुकूमनामा | [Sec. 58(*AB*)] |
| direction | निदेश | [Sec. 7 (*I*)] |
| disable | विकलांग | [Sec. 6(*2*)(*a*)] |
| discharge | पार पाडणे | [Sec. 49 (*1*)] |
| disciplinary committee | शिस्तविषयक समिती | [Sec. 7(*c*)] |
| dispute | तंटा | [Sec. 15(*2*)(*a*)] |
| disqualification | अनर्हता | [Sec. 10*B*] |
| donation | देणगी | [Sec. 6 (*3*)] |
| effective | प्रभावीरीत्या | [Sec. 6 (*dd*)] |
| electorate | मतदारगण | [Sec. 3(*2*)(*b*)] |
| eminent jurists | विधि मीमांसक | [Sec. 6 (*ee*)] |
| enrolment committee | नावनोंदणी समिती | [Sec. 10(*1*)(*b*)] |
| entitled | हक्कदार | [Sec. 14] |
| etiquette | शिष्टाचार | [Sec. 7(*b*)] |
| Executive Committee | कार्यकारी समिती | [Sec. 10(*1*)(*a*)] |
| existing | विद्यमान | [Sec. 56] |
| exofficio member | पदसिद्ध सदस्य | [Sec. 8A(*1*)(*i*)] |
| final examination | अंतिम परीक्षा | [Sec. 34(*2*)] |
| foregoing power | पूर्ववर्ती अधिकार | [Sec. 15(*2*)] |
| gift | दान | [Sec. 6(*3*)] |
| graduate | स्नातक | [Sec. 24(*2*)] |
| grant | अनुदान | [Sec. 6(*3*)] |
| grounds in support | पुष्ट्यर्थ | [Sec. 26(*2*)] |
| immediately before | लगतपूर्वी | [Sec. 4(*2*)(*2a*)] |
| immovable | जंगम | [Sec. 5] |
| implementation | अंमलबजावणी | [Sec. 6(*dd*)] |
| indemnity | हानिरक्षण | [Sec. 48(*m.n.*)] |
| indigent | निर्धन | [Sec. 6(*2*)(*a*)] |
| in particular | विशेषत: | [Sec. 15(*2*)] |
| instalment | हप्ता | [Sec. 28(*2*)(*e*)] |
| interest | हितसंबंध | [Sec. 6(*d*)] |
| interested person | हितसंबंधित व्यक्ती | [Sec. 35(*1a*)] |
| intermediate | माध्यमिक | [Sec. 34(*2*)] |
| invalid | विधिअग्राह्य | [Sec. 13] |
| investment | गुंतवणूक | [Sec. 15(*2*)(*n*)] |
| issuing commission | आयोगपत्रे काढणे | [Sec. 42(*1*)(*e*)] |
| journal | कालिक | [Sec. 6(*ee*)] |
| Judicial Commissioner | न्यायिक आयुक्त | [Sec. 2(*1*)(*g*)] |
| judicial proceeding | न्यायिक कार्यवाही | [Sec. 42(*1*)pro.(*a*)] |
| jurisdiction | अधिकारिता | [Sec. 25(*2*)] |
| lawful | विधिसंमत | [Sec. 58*B*(*2*)] |

(शा.म.मु.) एच ४०६६—६ (१,०३५—५-२००७)

| | | |
|---|---|---|
| legal practitioner | विधि व्यवसायी | [Sec. 2(*1*)(*i*)] |
| letter of patent | एकस्वपत्र | [Sec. 50(*2*)(*d*)] |
| management | व्यवस्थापन | [Sec. 15(*2*)(*n*)] |
| misrepresentation | विपर्यास | [Sec. 26(*1*)] |
| moral turpitude | नैतिक अधोगती | [Sec. 24A(*1*)(*a*)] |
| motion | समावेदन | [Sec. 35(*1a*)] |
| nominated | नामनिर्देशित | [Sec. 8(*1*)(*II*)] |
| opinion | अभिप्राय | [Sec. 42(*5*)] |
| pending | प्रलंबित | [Sec. 8(2)(*c*)] |
| perpetual succession | अखंड परंपरा | [Sec. 5] |
| pleading | युक्तिवाद | [Sec. 24(*3*)(*aa*)] |
| postal ballot | टपाल मतपत्रिका | [Sec. 15(*2*)(*a*)] |
| pre-audience | पूर्वसुनावणी | [Sec. 23(*1*)] |
| presiding officer | पीठासीन अधिकारी | [Sec. 42(*1*)(*pro.*)(*a*)] |
| prevail | अधिभावित | [Sec. 49A(*4*)] |
| privilege | विशेषाधिकार | [Sec. 6(*d*)] |
| process | आदेशिका | [Sec. 42(*3*)] |
| professional conduct | व्यावसायिक आचार | [Sec. 7(*b*)] |
| promotion | प्रचालन | [Sec. 6(*e*)] |
| proportional representation | प्रमाणशीर प्रतिनिधित्व | [Sec. 3(*2*)(*b*)] |
| public record | सार्वजनिक अभिलेख | [Sec. 42(*1*)(*d*)] |
| quorum | गणपूर्ती | [Sec. 15(*2*)(*h*)] |
| reciprocity | देवाण घेवाण | [Sec. 47] |
| reconstituted | पुनर्घटित | [Sec. 3(*6*)] |
| reject | फेटाळणे | [Sec. 18] |
| representation | प्रतिवेदन | [Sec. 18] |
| reprimanding | ताशेरे झाडणे | [Sec. 41(*1*)] |
| repugnant | प्रतिकूल | [Sec. 49A(*4*)] |
| restriction | निर्बंध | [Sec. 16(*3*)] |
| revenue agent | महसूल अभिकर्ता | [Sec. 2(1)(*i*)] |
| review | पुनर्विलोकन | [Sec. 48AA.] |
| revision | पुनरावलोकन | [Sec. 15(*2*)(*b*)] |
| revision | पुनरीक्षण | [Sec. 48A] |
| right | अधिकार | [Sec. 6(*d*)] |
| robe | अधिकारवस्त्र | [Sec. 49(*gg*)] |
| roll | 1. पट | [Sec. 58(*a*)(*3*)] |
| | 2. नामावली | [Sec. 2(*1*)(*r*)] |
| rule of construction | अन्वयार्थाचा नियम | [Sec. 51(*M.N.*)] |

| | | |
|---|---|---|
| seminar | चर्चासत्र | [Sec. 6(*ee*)] |
| single transferable vote | (एक) संक्रमणीय मत | [Sec. 3(*2*)(*b*)] |
| seniormost | ज्येष्ठतम | [Sec. 8(*1*)(*i*)] |
| Solicitor-General | सॉलिसिटर जनरल | [Sec. 23(*2*)] |
| special knowledge | विशेष ज्ञान | [Sec. 16(*2*)] |
| staff | कर्मचारीवर्ग | [Sec. 11(*1*)] |
| stamp duty | मुद्रांक शुल्क | [Sec. 24(*1*)(*c*)(*f*)] |
| standards | मानके | [Sec. 7(*b*)] |
| standing at the bar | वकिलीतली कारकीर्द | [Sec. 16(*2*)] |
| State roll | राज्य नामावली | [Sec. 35(*3*)(*d*)] |
| successor | उत्तराधिकारी | [Sec. 4(*3*)] |
| suit | दावा | [Sec. 5] |
| supervision | परिवेक्षण | [Sec. 7(*g*)] |
| taxation | कराधान | [Sec. 34(*1a*)] |
| temporary | अस्थायी | [Chapter VII (title)] |
| termof office | पदावधी | [Sec. 4(*3*)] |
| territory | राज्यक्षेत्र | [Sec. 24(*1*)(*c*)(*IV*)] |
| to be intended | अभिप्रेत असणे | [Sec. 48] |
| to call inquestion | हरकत घेणे | [Sec. 13] |
| to confer | प्रदान करणे | [Sec. 6(*1*)(*h*)] |
| to deal with | हाताळणे | [Sec. 7(*f*)] |
| to dismiss | बडतर्फ करणे | [Sec. 24A(*1*)(*c*)] |
| to entertain | विचारार्थ स्वीकारणे | [Sec. 6(*c*)] |
| to lay down | निर्धारित करणे | [Sec. 34(*1*)] |
| to safeguard | रक्षण करणे | [Sec. 6(*d*)] |
| to summon | फर्मावणे | [Sec. 42(*1*)(*a*)] |
| transaction of business | कार्यपद्धत | [Sec. 10A(*4*)] |
| transitional | संक्रमणात्मक | [Chapter VII (title)] |
| transitional period | संक्रमण काळ | [Sec. 58] |
| undue influence | गैररीतीने वशिला | [Sec. 23(*1*)] |
| unfair discrimination | अनुचित भेदभाव | [Sec. 47(*1*)] |
| vacant | रिक्त | [Sec. 10*B*.] |
| vest | निहित | [Sec. 8(*2*)(*a*)] |
| void | शून्यवत | [Sec. 49A.(*4*)] |
| welfare scheme | कल्याणकारी योजना | [Sec. 6(*2*)(*a*)] |
| without prejudice | बाध न आणता | [Sec. 15(*2*)] |

## अधिवक्ता अधिनियम, १९६१

## THE ADVOCATE ACT, 1961

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अखंड परंपरा | perpetual succession | [कलम ५] |
| अधिकार | right | [कलम ६(घ)] |
| अधिकारक्षेत्र | jurisdiction | [कलम २५(२)] |
| अधिकारवस्त्र | robe | [कलम ४९ (छछ)] |
| अधिप्रमाणित प्रत | authenticated copy | [कलम १९] |
| अधिभावित | prevail | [कलम ४९क(४)] |
| अधिवक्ता | advocate | [कलम २(१)(क)] |
| अनुचित भेदभाव | unfair discrimination | [कलम ४७ (१)] |
| अनुदान | grant | [कलम ६(३)] |
| अनर्हता | disqualification | [कलम १०ख] |
| अभिप्राय | opinion | [कलम ४२(५)] |
| अभिप्रेत असणे | to be intended | [कलम ४८] |
| अस्थायी | temporary | [प्रकरण सात (शीर्षक)] |
| आकारण्यायोगी | chargeable | [कलम २४(१)(च)] |
| आदेशिका | process | [कलम ४२ (३)] |
| आयोगपत्रे काढणे | issuing commission | [कलम ४२ (१) (ङ)] |
| अंतिम परीक्षा | final examination | [कलम ३४(२)] |
| अंमलबजावणी | implementation | [कलम ६ (घघ)] |
| उत्तराधिकारी | successor | [कलम ४ (३)] |
| एकल संक्रमणीय मत | single transferable vote | [कलम ३ २ (ख)] |
| एकस्वपत्रे | letters of patent | [कलम ५०(२)(घ)] |
| अन्वयार्थाचा नियम | rule of construction | [कलम ५१(स.टी)] |
| कराधान | taxation | [कलम ३४(१क)] |
| कर्मचारीवर्ग | staff | [कलम ११ (१)] |
| कल्याणकारी योजना | welfare scheme | [कलम ६ २ (क)] |
| कार्यकारी समिती | executive committee | [कलम १०(१)(क)] |
| कार्यपद्धत | transaction of business | [कलम १०क(४)] |
| कार्यार्थ | acting | [कलम २४(३)(कक)] |
| कालिक | journal | [कलम ६(ङङ)] |
| गणपूर्ती | quorum | [कलम १५(२) (ज)] |
| गुंतवणूक | investment | [कलम १५(२)(ढ)] |
| गैरवर्तनाचे खटले | cases of misconduct | [कलम ६(ग)] |
| गैररीतीने वशिला | undue influence | [कलम २६(१)] |
| घटित | constituted | [कलम २ (१) (छ)(एक)] |
| चर्चासत्र | seminar | [कलम ६(ङङ)] |

| | | |
|---|---|---|
| ज्येष्ठतम | seniormost | [कलम ८(१)(एक)] |
| जंगम | immovable | [कलम ५] |
| टपाल मतपत्रिका | postal ballot | [कलम १५(२) (क)] |
| ताशेरे झाडणे | reprimanding | [कलम ४१(१)] |
| तंटा | dispute | [कलम १५ २ (घ)] |
| दान | gift | [कलम ६(३)] |
| दावा | suit | [कलम ५] |
| देणगी | donation | [कलम ६(३)] |
| देवाणघेवाण | reciprocity | [कलम ४७] |
| धर्मदान | benefaction | [कलम ६ (३)] |
| नामनिर्देशित | nominated | [कलम ८ (१)(दोन)] |
| नामावली | roll | [कलम २ (१) (ट)] |
| नावनोंदणी समिती | enrolment committee | [कलम १०(१)(ख)] |
| निगम निकाय | body corporate | [कलम ५] |
| निदेश | direction | [कलम ७(झ)] |
| निर्धारित करणे | to lay down | [कलम ३४ (१)] |
| नियत दिवस | appointed day | [कलम २ (१) (ख)] |
| निर्बंध | restrictions | [कलम १६(३)] |
| निर्धन | indigent | [कलम ६(२) (क)] |
| निहित | vest | [कलम ८(२)(क)] |
| नैतिक अधोगती | moral turpitude | [कलम २४क (१)(क)] |
| नैमित्तिक रिक्तपद | casual vacancy | [कलम १५(२) (च)] |
| न्यायिक आयुक्त | Judicial Commissioner | [कलम २(१) (छ)] |
| न्यायिक कार्यवाही | judicial proceeding | [कलम ४१(१) परंतुक (क)] |
| पट | roll | [कलम ५८(क)(३)] |
| पदभार | charge of the office | [कलम ४ (२क)परंतुक] |
| पदसिद्ध सदस्य | ex officio member | [कलम ८(क) (१) (एक)] |
| पदावधी | term of office | [कलम ४(३)] |
| पर्यवेक्षण | supervision | [कलम ७(छ)] |
| पाठ्यक्रम | course | [कलम ४९क (२)(घ)] |
| पार पाडणे | discharge | [कलम ४९ (१)] |
| पीठासीन अधिकारी | presiding officer | [कलम ४२ (१) परंतुक (क)] |
| पुनर्घटित | reconstituted | [कलम ३(६)] |
| पुनरावलोकन | revision | [कलम १५(२) (ख)] |
| पुनरीक्षण | revision | [कलम ४८क] |
| पुनर्विलोकन | review | [कलम ४८ कक] |
| पूर्ववर्ती अधिकार | foregoing power | [कलम १५ (२)] |
| पूर्वसुनावणी | pre-audience | [कलम २३(१)] |
| पूर्वोक्त | aforesaid | [कलम ६(झ)] |
| प्रचालन | promotion | [कलम ६(ङ)] |
| प्रतिकूल | repugnant | [कलम ४९ (क)(४)] |
| प्रतिपक्ष | adversary | [कलम ३४ (१क)] |

| | | |
|---|---|---|
| प्रतिवेदन | representation | [कलम १८] |
| प्रदान करणे | to confer | [कलम ६ (१)(ज)] |
| प्रभाविरीत्या | effective | [कलम ६ (१) (घघ)] |
| प्रमाणशीर प्रतिनिधित्व | proportional representation | [कलम ३ (२) (ख)] |
| प्रलंबित | pending | [कलम ८ (२) (ग)] |
| प्रामाणिकपणे | bona fide | [कलम १८] |
| पृष्ट्यर्थ | grounds in support | [कलम २६ (२)] |
| फर्मावणे | to summon | [कलम ४२ (१) (क)] |
| फेटाळणे | reject | [कलम १८] |
| बडतर्फ करणे | to dismiss | [कलम २४ क (१) (क)] |
| बाध न आणता | without prejudice | [कलम १५ (२)] |
| मतदारगण | electorate | [कलम ३(२) (ख)] |
| मतैक्य होणे | agree to | [कलम ४९ क (५)] |
| महसूल अभिकर्ता | revenue agent | [कलम २ (१) (ज्ञ)] |
| महाअधिवक्ता | Advocate General | [कलम ३ (२) (क)] |
| महा न्यायवादी | Attorney-General | [कलम ४ (१) (क)] |
| माध्यमिक | intermediate | [कलम ३४ (२)] |
| मानके | standards | [कलम ७ (ख)] |
| मुखत्यार | attorney | [कलम २४ (१) (ग)(चार)] |
| मुद्रांक शुल्क | stamp duty | [कलम २४ (१) (ग) (च)] |
| यथास्थिति | as the case may be | [कलम ४ (२क)] |
| योग्यता | ability | [कलम १६ (२)] |
| युक्तिवाद | pleading | [कलम २४ (३) (कक)] |
| रक्षण करणे | to safeguard | [कलम ६ (घ)] |
| राज्यक्षेत्र | territory | [कलम २४ (१)(ग)(चार)] |
| राज्य नामावली | state roll | [कलम ३५ (३) (घ)] |
| रिक्त | vacant | [कलम १०ख] |
| लगतपूर्वी | immediately before | [कलम ४ (२) (एक)] |
| लेखापरीक्षण | audit | [कलम १२ (२)] |
| लेखापरीक्षा | audit | [कलम १२] |
| लेखापाल | accountant | [कलम ११] |
| लेखे | accounts | [कलम ११(२)] |
| वकील परिषद | Bar council | [कलम २ (१) (घ)] |
| वकिलीतली कारकीर्द | standing at the bar | [कलम १६ (२)] |
| वादखर्च | cost of proceeding | [कलम ४३] |
| विकलांग | disable | [कलम ६२ (फ)] |
| विद्यमान | existing | [कलम ५६] |
| विद्या वर्ष | academic year | [कलम २४ (१) (ग) (तीन क)] |
| विधिअग्राह्य | invalid | [कलम १३] |

| | | |
|---|---|---|
| विधि मीमांसक | emient jurist | [कलम ६(ङङ)] |
| विधि व्यवसायी | legal practitioner | [कलम २ (१) (ज्ञ)] |
| विधिसंमत | lawful | [कलम ५८ ख(२)] |
| विचारार्थ स्वीकारणे | to entertain | [कलम ६ (ग)] |
| विपर्यास | misrepresentation | [कलम २६ (१)] |
| विशेषतः | in particular | [कलम १५ (२)] |
| विशेष ज्ञान | special knowledge | [कलम १६ (२)] |
| विशेषाधिकार | privilege | [कलम ६(घ)] |
| व्यवस्थापन | management | [कलम १५ (२) (ढ)] |
| व्यावसायिक आचार | professional conduct | [कलम ७ (ख)] |
| शिष्टाचार | etiquette | [कलम ७ (ख)] |
| शिस्तविषयक समिती | disciplinary committee | [कलम ७ (ग)] |
| शून्यवत | void | [कलम ४९ क (४)] |
| समावेदन | motion | [कलम ३५ (१क)] |
| समुचित निधी | appropriate fund | [कलम ६ (३)] |
| समुचित प्रधिकरण | appropriate authority | [कलम ५८कघ (क)] |
| सल्लामसलत करणे | imparting | [कलम ७ (ज)] |
| सहाय्य | aid | [कलम ६ (२) (ख)] |
| सामाईक मुद्रा | common seal | [कलम ५] |
| सार्वजनिक अभिलेख | public record | [कलम ४२ (१) (घ)] |
| सेवाशर्ती | conditions of service | [कलम १५ (२) (ट)] |
| सिद्धदोष | convicted | [कलम २४ क (१) (क)] |
| सॉलिसिटर-जनरल | Solicitor-General | [कलम २३ (२)] |
| स्थावर | movable | [कलम ५] |
| स्नातक | graduate | [कलम २४ (२)] |
| स्नातक पदवी | bachelor's degree | [कलम २(१) (ज)] |
| संक्रमण काळ | transitional period | [कलम ५८] |
| संक्रमणात्मक | transitional | [प्रकरण सात, शीर्षक] |
| हक्कदार | entitled | [कलम १४] |
| हप्ता | instalment | [कलम २८(२) (ङ)] |
| हरकत घेणे | to call in question | [कलम १३] |
| हाताळणे | to deal with | [कलम ७ (च)] |
| हानिरक्षण | indemnity | [कलम ४८ (स.टी.)] |
| हितसंबंध | interest | [कलम ६ (घ)] |
| हितसंबंधित व्यक्ती | interested person | [कलम ३५ (१क)] |
| हुकूमनामा | decree | [कलम ५८ कख] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई